भारतीय रिज़र्व बैंक

RESERVE BANK OF INDIA

www.rbi.org.in

आरबीआय/ २०१२-१३/७५

डीबीओडी क्र. डीआयआर.बीसी. १/१३.०३.००/२०१२-१३, जुलै २, २०१२

आषाढ ११, १९३४ (शक)

सर्व अनुसुचित वाणिज्य बँका (आरआरबी सोडून)

महोदय,

**देशांतर्गत, सर्वसाधारण अनिवासी (एनआरओ) व अनिवासी (बाह्य) (एनआरई) खात्यात रूपये ठेवीवरील व्याजदरांवरील महापरिपत्रक**

कृपया, वरील विषयासंबंधाने बॅकांना दिलेल्या जून ३०,२०११ पर्यंतच्या मार्गदर्शकतत्वे / निदेशांचे एकत्रीकरण केलेले आमचे महापरिपत्रक डीबीओडी. क्र. डीआयआर. बीसी. ९/१३.०३.००/ २०११-१२ दिनांक जून ३०, २०११ चा संदर्भ घ्यावा. हया महापरिपत्रकात जून ३०, २०१२ पर्यंत दिल्या गेलेल्या सुचना अद्यावत करण्यात आल्या असून ते आरबीआयच्या (http://www.rbi.org.in) हया वेबसाईटवरही टाकण्यात आले आहे. हया परिपत्रकाची प्रत सोबत जोडली आहे.

आपली विश्वासू

(सुधा दामोदर)

मुख्य महाव्यवस्थापक

सोबत वरीलप्रमाणे

बँकिंग ऑपरेशन्स आणि विकास विभाग, केंद्रीय कार्यालय, १३ वा मजला,एनसीओबी, शहिद भगत सिंग मार्ग, फोर्ट, मुंबई - 400001,

फॅक्स क्र. ०२२-२२७०१२४१, दुरध्वनी क्र. ०२२-२२६०१०००, ईमेल : cgmicdbodco@rbi.org.in

| | अनुक्रमाणिका | |
|---|---|---|
| **परिच्छेद क्र** | **तपशील** | |
| अ | उदेश | ४ |
| ब | वर्गीकरण | ४ |
| क | मागील सूचना | ४ |
| ड | उपयोग | ४ |
| १ | प्रस्तावना | ६ |
| १.१ | देशांतर्गत ठेवी | ६ |
| १.२ | सर्वसाधारण अनिवासी (एनआरओ) | ६ |
| १.३ | अनिवासी (बाहय) (एनआरई) खाती | ६ |
| १.४ | व्याजदार विनियमन | ७ |
| २ | मार्गदर्शक तत्वे | ८ |
| २.१ | व्याख्या | ८ |
| २.२ | किमान मुदत व बचत ठेवी व मुदत ठेवींवर घावयाचे व्याज | ९ |
| २.३ | स्थिर ठेवींवर व्याज-दान - व्याज काढण्याची रीत | १० |
| २.४ | आर्मी ग्रुप इन्सुअरन्स डायरेक्टरेट इत्यादिंना अतिरिक्त व्याज | ११ |
| २.५ | प्रादेशिक ग्रामीण क्षेत्रिय बँकांनी अतिरिक्त व्याज देण्याबाबत मुखत्यारी | ११ |
| २.६ | बँकेचे कर्मचारी व त्यांचे खास संघ यांच्या ठेवींवर टक्क्यापेक्षा अधिक नसलेले अतिरिक्त व्याज देण्याबाबत मुखत्यारी | १२ |
| २.७ | बँकेचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक व कार्यकारी संचालकाच्या ठेवींवर एक टक्क्यापेक्षा अधिक नसलेला अतिरिक्त व्याज देण्याबाबत मुखत्यारी | १२ |
| २.८ | प्रादेशिक ग्रामीण बँकांनी आयोजक बँकांकडे ठेवलेल्या चालु खात्यावर व्याज देण्याबाबत मुखत्यारी | १२ |
| २.९ | एखाद्या शेतकऱ्याच्या संयुक्त कॅश क्रेडिट खात्यामधील किमान जमा शिल्लक रकमेवर व्याज देण्यावर मुखत्यारी | १२ |
| २.१० | वरिष्ठ नागरिकांसाठी ठेव योजना | १२ |
| २.११ | मुदत ठेवीमध्ये गुंतवणुक करण्यासाठी, मुदतठेव, रोजची ठेव ह्या स्वरुपातील ठेव किंवा आवर्ती ठेव ह्यांचे रुपांतरण | १४ |
| २.१२ | मुदत बाहय ठेवींचे नूतनीकरण | १४ |
| २.१३ | मुदत ठेवी विरूध्द् अग्रिम राशी - व्याज आकारण्याची रीत | १४ |
| २.१४ | मुदत ठेवी विरूध्द् घेतलेल्या अग्रिम राशींसाठी मार्जिन | १५ |
| २.१५ | एनआर(ई) आरए ठेवींविरुध्द द्यावयाच्या अग्रिम राशींवरील निर्बंध-कर्जाचे आकारमान प्रमाण | १५ |
| २.१६ | मृत ठेवीदाराच्या ठेव खात्यावर द्यावयाचे व्याज | १५ |
| २.१७ | ठेवींवरील व्याजातील बदल व निरनिराळ्या व्याजदारांच्या व्याप्तिनुसार ठेवींची माहिती (ब्रेकअप) हयाबाबत आरबीआयला कळविणे | १६ |
| २.१८ | संयुक्त खातेदारांच्या नावात भर घालणे/ खोडणे | १६ |
| २.१९ | व्यवहारांचे राउडिंग ऑफ करणे | १६ |
| २.२० | मुदत ठेवींची पावती देणे | १६ |
| २.२१ | रविवार / सुट्टी / व्यवहार न करावयाच्या कामाच्या दिवशी परिपक्व होणाऱ्या मुदत ठेवींवर व्याज प्रदान | १७ |
| २.२२(अ) | डिपॉझिट मोबिलायझेशन योजना | १७ |
| २.२२(ब) | लॉक - इन कालावधी असलेले विशेष मुदत ठेव उत्पाद | १७ |

| | | |
|---|---|---|
| २.२३ | बचत खात्यातील किमान शिल्लक | १७ |
| २.२४ | नो - फ्रिल्स खाते | १८ |
| २.२५ | सूट ( एक्झेंप्शन्स ) | १८ |
| २.२६ | मनाई | १९ |
| जोडपत्र १ | देशांतर्गत ठेवीवरील व्याजदार | २२ |
| जोडपत्र २ | एनआरई ठेवींवरील व्याजदार | २३ |
| जोडपत्र ३ | परिच्छेद २.२७ (एन) (१) खाली मनाईवरील सूट | २५ |
| परिशिष्ट | एकत्रित केलेल्या परिपत्रकांची यादी | २६ |

**देशांतर्गत, सर्वसाधारण अनिवासी (एनआरओ) व अनिवासी (बाहय) (एनआरई) खात्यात रूपये ठेवीवरील व्याजदरांवरील महापरिपत्रक**

**अ) उद्देश**

भारतीय रिझर्व बँकेने, देशांतर्गत, सर्वसाधारण अनिवासी (एन आर ओ), आणि अनिवासी (बाहय) (एन आर ई) खात्यांमध्ये ठेवलेल्या रुपये ठेवीवरील व्याजदरांबाबत वेळावेळी दिलेले निदेश एकत्रित करणे.

**ब) वर्गीकरण**

बँकिंग रेग्युलेशन अधिनियम, १९४९ अन्वये दिल्या गेलेल्या अधिकारानुसार रिझर्व बँकेने दिलेली वैधानिक मार्गदर्शक तत्वे.

**क) पूर्वीच्या सुचना**

वरील विषयावरील **परिशिष्ट -४** मध्ये असलेल्या सुचना / निदेश ह्या महापरिपत्रकात एकत्रित करण्यात आल्या आहेत.

**ड) उपयोग**

प्रादेशिक ग्रामीण बँका सोडून सर्व अनुसूचित वाणिज्य बँकाना लागु

**रचना**

१) प्रस्तावना
२) मार्गदर्शक तत्वे

२.१ व्याख्या

२.२ किमान मुदत व बचत ठेवी व मुदत ठेवींवर घावयाचे व्याज
२.३ स्थिर ठेवींवर व्याज-दान - व्याज काढण्याची रीत
२.४ आर्मी ग्रुप इन्सुअरन्स डायरेक्टरेट इत्यादिंना अतिरिक्त व्याज
२.५ बँकेचे कर्मचारी व त्यांचे खास संघ हयांच्या ठेवींवर टक्क्यापेक्षा अधिक नसलेले अतिरिक्त व्याज देण्याबाबत मुखत्यारी
२.६ बँकेचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक व कार्यकारी संचालकाच्या ठेवींवर एक टक्क्यापेक्षा अधिक नसलेला अतिरिक्त व्याज देण्याबाबत मुखत्यारी
२.७ प्रादेशिक ग्रामीण बँकांनी आयोजक बँकांकडे ठेवलेल्या चालु खात्यावर व्याज देण्याबाबत मुखत्यारी
२.८ एखाद्या शेतकऱ्याच्या संयुक्त कॅश क्रेडिट खात्यामधील किमान जमा शिल्लक रकमेवर व्याज देण्यावर मुखत्यारी
२.९ वरिष्ठ नागरिकांसाठी ठेव योजना
२.१० मुदत ठेवीची मुदतपूर्व निकासी
२.११ एखादी मुदत ठेव, रोजच्या ठेवीच्या स्वरूपातील ठेव किंवा पुर्नगुंतवणुकीसाठी असलेली आवर्ती ठेव हयांचे मुदत ठेवीत रूपांतरण
२.१२ मुदत बाहय ठेवींचे नूतनीकरण
२.१३ मुदत ठेवी विरूध्द् अग्रिम राशी - व्याज आकारण्याची रीत
२.१४ मुदत ठेवी विरूध्द् घेतलेल्या अग्रिम राशींसाठी मार्जिन
२.१५ एनआर (ई) आर ए ठेवींविरूध्द् घेतलेल्या अग्रिम राशींबाबतचे निर्बंध — कर्जाचे प्रमाण/आकारमान
२.१६ मृत ठेवीदाराच्या ठेव खात्यावर द्यावयाचे व्याज

२.१७ ठेवींवरील व्याजातील बदल व निरनिराळ्या व्याजदारांच्या व्याप्तिनुसार ठेवींची माहिती (ब्रेकअप) हयाबाबत आरबीआयला कळविणे
२.१८ संयुक्त खातेदारांच्या नावात भर घालणे/ कमी करणे
२.१९ व्यवहारांचे राउडिंग ऑफ करणे
२.२० मुदत ठेवींची पावती देणे
२.२१ रविवार / सुट्टी / व्यवहार न करावयाच्या कामाच्या दिवशी परिपक्व होणाऱ्या मुदत ठेवींवर व्याज प्रदान
२.२२(अ) डिपॉझिट मोबिलायझेशन योजना
२.२२ (ब) लॉक - इन कालावधी असलेले विशेष मुदत ठेव उत्पाद
२.२३ बचत खात्यातील किमान शिल्लक
२.२४ नो - फ्रिल्स खाते
२.२५ माफी ( एक्झेंप्शन्स )
२.२६ मनाई

जोडपत्र १ देशांतर्गत ठेवीवरील व्याजदार
जोडपत्र २ एनआरई ठेवींवरील व्याजदार
जोडपत्र ३ परिच्छेद २.२६ (एन) (१) खाली मनाईवरील सूट
परिशिष्ट एकत्रित केलेल्या परिपत्रकांची यादी

## १)    प्रस्तावना

### १.१    देशांतर्गत ठेवी

सुधारणा होण्यापूर्वी, बँकाद्वारे दिल्या जाणाऱ्या ठेवींवरील व्याजदर व मुदत आरबीआयद्वारे विहित केली जात असे. बँक-सेवा देणा-यांमध्ये किंमती/मूल्याबबात कोणतीही चढाओढ नव्हती आणि ग्राहकाला निवड करण्यासाठी सीमीत उत्पादच उपलब्ध होतो, वि- विनियमन केल्यामुळे, बचत ठेवी सोडल्यास, निरनिराळया परिपक्वता कालासाठी ठेवीदाराला पर्याय उपलब्ध होतात. तसेच किमान सात दिवसाच्या मुदत ठेवीवरही ग्राहक व्याज मिळवू शकतो. एका कट् ऑफ बिंदूच्या पलिकडे, बँका आता निरनिराळया आकारमानाच्या ठेवींवर निरनिराळे व्याज दर ठेवण्यास मुक्त आहेत, कारण व्यवहाराचे मूल्य/खर्च आकारमानानुसार बदलतो. हयापूर्वी, ठेवींच्या मुदतपूर्व निकासीसाठी आरबीआयने दंडाची रचना ठरविली होती पण आता ही बाब प्रत्येक बँकेवर सोपिवली गेली असल्याने बँका त्यांचे व्याजदर स्वतःच ठरवू शकतात.

२२ ऑक्टोबर,१९९७ पासून, त्यांच्या संचालक मंडळाच्या / ॲसेट लायाबिलीटी मॅनेजमेंट कमिटिच्या पूर्व मंजूरीनुसार, वाणिज्य बँकाना, निरनिराळया मुदतीच्या परिपक्वतेच्या मुदत ठेवींवरील त्यांचे स्वःताचे व्याजदर ठरविण्याचे स्वातंत्र्य रिझर्व बँकेने दिले होते. तथापि बचत खात्यावरील व्याजदर मात्र, २५ ऑक्टोबर २०११ पासून, परिच्छेद २.२ ब (३) च्या अटींचे पालन केले असल्यास डिरेग्युलेट केला गेला आहे.

एखादे देशांतर्गत रुपये खाते, चालु, बचत किंवा मुदत ठेव म्हणून उघडता येते.

### १.२    सर्वसाधारण अनिवासी (एन आर ओ) खाती

खऱ्या स्थानिक व्यवहारांमधून मिळालेले उत्पन्न गोळा करण्यासाठी, एनआरआय, अनिवासी सर्वसाधारण (एन आर ओ) खाती उघडू शकतात. एनआरओ खाती ही रूपये-खाती असल्याने, अशा खात्यांमधील विनिमयाच्या दराच्या जोखमी स्वतः खातेदारांवरच असतात. एखादा नागरिक एनआरआय होतो तेव्हा त्याची अस्तित्वात असलेली खाती एनआरओ म्हणून समजली जातात. अशा खात्यांमुळे भारतात राहाणाऱ्या विदेशी नागरिकांच्या गरजाही पूर्ण होतात. एडी वर्ग ५ बँका, भारतात नोकरीसाठी आलेल्या आणि निवासी बचत खाते उघडण्यास/चालविण्यास पात्र असलेल्या विदेशी नागरिकांना त्यांच्या भारतामधील निवासी खात्यांना, ते हा देश सोडून गेल्यावर त्यांची न्याय्य थकबाकी मिळविण्यास मदत व्हावी ह्यासाठी, काही अटींवर, एनआरओ खाती म्हणून ठरवू शकतात. एनआरओ खाती ही, चालू, बचत, आवर्ती किंवा मुदत ठेवीच्या स्वरुपात ठेवता येतात.एनआरओ ठेवींचे मुद्दल जरी प्रत्यावर्तित करता येत नसेल तरी सध्याचे उत्पन्न व व्याजदराचे उत्पन्न प्रत्यावर्तित करता येते. त्याशिवाय एनआर/ पीआयअओ, दर आर्थिक वर्षासाठी, युएसडी १० लाख पेक्षा अधिक नसलेली व त्यांच्या एनआरओ खात्यात शिल्लक असलेली रक्कम / मालमत्तेच्या विक्रितून आलेलही रक्कम / त्याने भारतात वारशाने मिळवलेल्या मालमत्तेच्या विक्रीची रक्कम प्रेषित करु शकतात. मात्र त्यासाठी वारशाने / कायद्याने तशी मालमत्ता मिळाल्याचा कागदोपत्री पुरावा व घोषणापत्र आणि सेंट्रल बोर्ड ऑफ डायरेक्ट टॅक्सेसचे परिपत्रक क्र.१०/ २००२ दि. ऑक्टोबर ९, २००२ मध्ये दिलेल्या नमुन्यामधील चार्टर्ड अकाऊंटंचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

### १.३    अनिवासी (बाहय) (एन आर ई) खाती

अनिवासी (बाहय) रुपये खाते एन आर (ई) आर ए योजना - जिला एन आर ई योजना असेही म्हटले जाते. १९७० मध्ये सुरु करण्यात आली. कोणतीही एनआरआय व्यक्ती परदेशातील बँकांनमधून पाठविलेल्या निधिमधून एनआरई खाते उघडू शकते.हे प्रत्यावर्तनीय खाते असून त्यात

दुसऱ्या एखाद्या एनआरई खात्यातून किंवा एफसीएनआर (बी) खात्यातूनही हस्तांतरण करता येते. एनआरई रुपये खाते हे चालू, बचत किंवा मुदत ठेवीच्या स्वरुपात उघडता येते. एनआरई खात्यामधून स्थानिक प्रदाने मुक्तपणे करता येऊ शकतात. हे खाते रुपयांच्या स्वरुपात असल्याने ठेवीदारावर विनिमयाची जोखीम असते. एनआरआय / पीआयओ हयांना त्यांचे उत्पन्न त्यांच्या अनिवासी (बाहय) रुपये खात्यात जमा करण्याचा पर्याय उपल्बध आहे. मात्र त्यासाठी जमा केलेली रक्कम ही त्या अनिवासी खातेदाराचे सध्याचे उत्पन्न आहे व त्यावरील आयकर भरला गेला आहे / त्याबाबत तरतुद केली गेली आहे ह्या बाबत आधिकृत डीलरचे समाधान झाले पाहिजे.

## १.४ एनआरई व एनआरओ ठेवींवरील व्याजदराचे विनियमन

१९९० च्या पूर्वी, देशांतर्गत ठेवी दरांना अनुसरुन, निरनिराळया एनआरआय ठेव-योजनांवरील व्याजदर विनियमित केले गेले होते. लवचिकतेची पहिली पायरी म्हणून, देशांतर्गत ठेवींसाठी असलेल्या लवचिकतेनुसार, एनआरई ठेवींसाठीही, १९९२ मध्ये मुदतनिहाय पुर्नमांडणी विहित केली गेली होती. एनआरई व देशांतर्गत ठेवींच्या परिपक्वाता रचनेत एकवाक्यता यावी हयासाठी, २ वर्षापेक्षा अधिक मुदतीच्या एनआरई मुदत ठेवींवरील व्याजदर, ४ एप्रिल १९९६ पासून मुक्त करण्यात आले होते, तसेच, १ वर्षापेक्षा अधिक मुदत ठेवीवरील व्याजदर १६ एप्रिल १९९७ पासून मुक्त करण्यात आले होते. सप्टेंबर १३, १९९७ पासून सर्व प्रकारच्या परिपक्वताकाळांसाठी व्याजदर ठरविण्याचे संपूर्ण स्वातंत्र्य बँकांना देण्यात आले होते.

वित्तीय बाजारातील बदलत्या परिस्थितीचा विचार करुन, १७ जुलै, २००३ पासून, एनआरई मुदत ठेवींवरील व्याजदर, त्याच परिपक्वता कालासाठी असलेल्या युएस डॉलर लिबॉर/स्वॅप रेट्स पेक्षा २५० पॉईंट सिलिंग ठेवून, आंतरराष्ट्रीय दरांशी जोडण्यात आले होते. हे सिलिंग रेट्स कमी कमी करण्यात आले व २४ एप्रिल २००७ रोजी व्यवहार बंद झाल्यावर ते, त्याच परिपक्वता काळच्या लिबॉर/स्वॅप रेट्स पर्यंत खाली आणण्यात आले होते. तथापि, २००८-०९ ह्या वर्षात, सिलींग रेट्स मध्ये सतत बदल होत राहून, नोव्हेंबर १५, २००८ रोजी, व्यवहार बंद झाल्यावर, त्याच परिपक्वता कालासाठी असलेल्या लिबॉर/स्वॅप रेट्स पेक्षा १७५ पॉईंट्सने वाढले. त्याच बरोबर एनआरई बचत ठेवी दारांचा, देशांतर्गत बचत ठेवीदारांशी असलेला संबंध तोडण्यात आला व एनआरई बचत ठेवींचा अंतिम मर्यादा दर/(सिलींग रेट्) १७ एप्रिल २००४ पासून, ६ महिने मुदतीच्या युएस डॉलर लिबॉर/स्वॅप रेट्स एवढा ठरविण्यात आला. तथापि, नोव्हेंबर १७, २००५ रोजी, भारतात व्यवहार बंद झाल्यावर, एनआरई बचत ठेवींवरील व्याजदर देशांतर्गत बचत ठेवीवरील व्याजदरा एवढा करण्यात आला. अनिवासी ठेवींना चालना देण्याबाबत बँकांना अधिकतर लवचिकता देण्यासाठी, आणि अस्तित्वात असलेल्या बाजार स्थितीचा विचार करुन अनिवासी (बाह्य) रुपये (एनआरई) ठेवी आणि सर्वसाधारण अनिवासी (एनआरओ) ठेवी ह्यावरील व्याजदरांचे निर्विनियम (डिरेग्युलेशन) करण्याचे ठरविण्यात आले (सर्वसाधारण अनिवासी (एनआरओ) खात्यांखालील मुदत ठेवींवरील व्याजदरांचे डिरेग्युलेशन आधीच करण्यात आले आहे) त्यानुसार, डिसेंबर १६, २०११ पासून, अनिवासी (बाह्य) रुपये (एनआरई) ठेवी खाती खालील, एक वर्ष व अधिक मुदतीच्या बचत ठेवी व मुदत ठेवींसाठी, आणि सर्वसाधारण अनिवासी (एनआरओ) खात्यांखालील बचत ठेवींसाठी, स्वतःचे व्याजदर ठरविण्याचे स्वातंत्र्य बँकांना देण्यात आले आहे. तथापि, बँकांद्वारे, एनआरई व एनआरओ ठेवींवर दिले जाणारे व्याजदर, डोमेस्टिक (देशांतर्गत) रुपये-ठेवींवर त्यांच्याद्वारे दिल्या जाणा-या व्याजदरांपेक्षा अधिक असणार नाहीत. अनिवासी ठेवींना चालना देण्याबाबत बँकांना अधिकतर लवचिकता देण्यासाठी, आणि अस्तित्वात असलेल्या बाजार स्थितीचा विचार करुन अनिवासी (बाह्य) रुपये (एनआरई) ठेवी आणि सर्वसाधारण अनिवासी (एनआरओ) ठेवी ह्यावरील व्याजदरांचे निर्विनियम (डिरेग्युलेशन) करण्याचे ठरविण्यात आले (सर्वसाधारण अनिवासी (एनआरओ) खात्यांखालील मुदत ठेवींवरील व्याजदरांचे डिरेग्युलेशन आधीच करण्यात आले आहे) त्यानुसार, डिसेंबर १६, २०११ पासून, अनिवासी (बाह्य) रुपये (एनआरई) ठेवी खाती खालील, एक वर्ष व अधिक मुदतीच्या बचत ठेवी व मुदत ठेवींसाठी, आणि सर्वसाधारण अनिवासी (एनआरओ) खात्यांखालील बचत ठेवींसाठी, स्वतःचे व्याजदर ठरविण्याचे स्वातंत्र्य बँकांना देण्यात आले आहे. तथापि, बँकांद्वारे, एनआरई व एनआरओ ठेवींवर दिले जाणारे व्याजदर, डोमेस्टिक (देशांतर्गत) रुपये-ठेवींवर त्यांच्याद्वारे दिल्या जाणा-या व्याजदरांपेक्षा अधिक असणार नाहीत

## २ मार्गदर्शक तत्वे

वाणिज्य बॅकांनी, देशांतर्गत, सर्वसाधारण अनिवासी (एनआरओ) व अनिवासी (बाह्य) खात्यातील (एनआरई) स्वीकारलेल्या किंवा नुतनिकरण केलेल्या ठेवींवर व्याजदर ठेऊ नये. याला अपवाद म्हणजे ह्यामधील **जोडपत्र १ व २** मध्ये विहित केलेले व लागु असलेल्या दर व खालील परिच्छेदात दिलेल्या अटी व शर्ती ह्यानुसार दिलेले दर.

### २.१ व्याख्या

ह्या परिपत्रकासाठी

(अ) "डिमांड लायाबिलिटीज" व "टाईम लायाबिलिटीज" म्हणजे, भारतीय रिझर्व बँक अधिनियमन, १९३४ च्या कलम ४२ च्या उपकलम (२) खाली बँकेने सदर केलेल्या रिटर्नमध्ये दर्शविलेल्या लायाबिलिटीज (दायित्वे).

(ब) "डिमांड डिपॉझिट" म्हणजे, बँकेला मिळालेली व आवाहित (डिमांड) केल्यावर परत करता येण्यासारखी (विथड्रॉएबल) ठेव.

(क) "सेव्हिंग डिपॉझिट" म्हणजे डिमांड डिपॉझिट स्वरुपाची ठेव हे ठेव खाते असून "सेव्हिंग अकाउंट" किंवा "सेव्हिंग बँक अकाउंट" किंवा इतर कोणत्याही नावाचे खाते असून, बँकेने विहित केलेल्या कालावधीत त्यातून निकासींची संख्या व रक्कम ह्यावर बँकेचे निर्बंध लागू असतील.

(ड) "टर्म डिपॉझिट" (मुदत ठेव) म्हणजे एका स्थिर कालासाठी बँकेला मिळालेली ठेव, व जो तो स्थिरकाळ संपल्यावरच परत काढता येईल. ह्यात आवर्ती / क्युम्युलेटिव / पुनर्गुंतवणुक ठेवी, रोख प्रमाणपत्रे इत्यादी समाविष्ट आहेत.

(ई) "नोटिस डिपॉझिट" म्हणजे, एका विशिष्ट कालासाठी असलेली व एका संपूर्ण बँकिग दिवसाच्या नोटिसीवर परत काढता येण्याजोगी ठेव.

(फ) "चालू खाते" (करंट अकाउंट) म्हणजे, एक प्रकारचे डिमांड डिपॉझिट, ज्यात त्या खात्यात असलेल्या शिल्लकतेनुसार कितीही वेळा किंवा ठरविलेल्या रकमेची निकासी करता येऊ शकते. व ह्यात बचत ठेव खाते किंवा मुदत ठेव खाते नसलेली इतर खातीही समाविष्ट आहेत.

(ग) "काउंटर व्हेलिंग इंटरेस्ट" म्हणजे, बँकेच्या कर्जदाराने ठेवलेल्या चालू खात्यासारख्या खात्यावर संमत असलेला व्याजाचा लाभ.

(ह) "बजेटरी ॲलोकेशन" म्हणजे, सरकारने अंदाजपत्रकाद्वारे केलेले निधीचे वाटप. ह्यात सरकारचा सर्व खर्च प्रतिबिंबित होतो. कोणतीही संस्था, मग ती अनुदान मिळणारी सरकारी खाते असो, अर्ध-सरकारी, निम-सरकारी संस्था असो, ती बजेटरी ॲलोकेशनवर अवलंबून असल्याचे समजले जाते. संस्थांना दिलेली अनुदानेही बजेटरी ॲलोकेशनच्या स्वरुपाचीच असतात. अशा संस्थांच्या भाग-भांडवलात सरकारने गुंतवलेली रक्कमही बजेटरी ॲलोकेशनचा एक भागच असते नगरपालिका निगम, जिल्हा परिषदा, तालुका पंचायती व ग्रामपंचायती ह्यासारख्या स्थानिक संस्थांनाही "भरपाई व नेमलेली रक्कम" ह्या स्वरुपात दिलेले अनुदानही बजेटरी ॲलोकेशन एक भाग असत तथापि ह्या संस्थांनी गोळा केलेला कर हा, केंद्र व राज्य सरकारांच्या बजेटरी ॲलोकेशनची व्याख्या व व्याप्तीखाली येत नाही.

(आय) "सार्वजनिक क्षेत्रातील बँक" (पब्लिक सेक्टर बँक) म्हणजे, स्टेट बँक ऑफ इंडिया अधिनियम, १९५५ साली स्थापन झालेली भारतीय स्टेट बँक किंवा बँकिंग कंपनीज (ॲक्विझिशन्स अँड ट्रान्स्फर ऑफ कंपनीज) अधिनियम १७७० च्या कलम (ब) खाली व्याख्या केलेली बँक किंवा बँकिंग कंपनीज (ॲक्विझिशन्स अँड

ट्रान्स्फर ऑफ कंपनीज) अधिनियम १९८० साली व्याख्या केलेली नवीन कॅरेस्पाँडिंग बँक किंवा स्टेट बँक ऑफ इंडिया (सबसिडिअरी बँक्स) अधिनियम, १९५९ चा कलम दोन मधील खंड (के) मध्ये व्याख्या केलेली सबसिडिअरी बँक

सूचना – केवळ रिझर्व बँकेने अशा ठेवी स्वीकारण्यास आधिकृत केलेल्या बँकेद्वारे एनआरओ / एनआरई ठेवी स्वीकारल्या जाऊ शकतात.

## २.२ बचत ठेवी व मुदत ठेवींवरील किमान मुदत व द्यावयाचा व्याजदर

### २.२. अ) किमान मुदत

#### १) देशांतर्गत / एनआरओ मुदत ठेवी

देशांतर्गत / एनआरओ मुदत ठेवींसाठी किमान मुदत ७ दिवसांची आहे. नोव्हेंबर १, २००४ च्या आधी बँकाना रुपये १५ लाख व अधिक रक्कमेच्या व किमान ७ दिवसांच्या परिपक्वता काळाच्या मुदत ठेवी स्वीकारण्याची परवांगी होती. रु १५ लाखांपेक्षा कमी रक्कमेच्या मुदत ठेवींसाठी किमान परिपक्वता काळ १५ दिवसांचा होता. नोव्हेंबर १, २००४ पासून रुपये १५ लाखांपैक्षा कमी रक्कमेच्या देशांतर्गत / एनआरओ ठेवींसाठी किमान मुदत १५ दिवसांनवरुन ७ दिवस करण्यात आली आहे.

#### २) एनआरई ठेवी

एप्रिल २९, २००३ पासून, एनआराई ठेवींसाठी असलेला किमान परिपक्वता काळ ६ महिन्यांवरुन १ वर्षापर्यंत वाढविण्यात आला आहे. आणि नविन एनआराई मुदत ठेवींचा परिपक्वता काळ एफसीएनआर (बी) ठेवींशी समन्वय राखत, एक वर्षावरुन ३ वर्षे करण्यात आला आहे. तथापि, त्यांच्या ॲसेट लायाबिलिटी विचारात घेऊन बँकाना, तीन वर्षांपेक्षा अधिक मुदतीच्या एनआरई ठेवी स्विकारण्याची परवानगी देण्यात आली आहे मात्र अशा दीर्घ मुदतीच्या ठेवींवरील व्याजदर ३ वर्षांसाठी असलेल्या ठेवींच्या व्याजदरापेक्षा अधिक नसावा.

### २.२. ब) व्याजाचे प्रदान

१) ह्या परिपत्रकाच्या **जोडपत्र १ व जोडपत्र २** मध्ये विहित केलेल्या दरांनुसार बँकानी बचत ठेवी, मुदत ठेवी व एनआरई ठेवींवर व्याज द्यावे.
(२) वाणिज्य बँकांच्या शाखांमध्ये संगणकी करणाचा स्तर समाधानकारक असल्याचे दिसून आल्याने, अनुसूचित वाणिज्य बँकांना सांगण्यात आले होते की त्यांनी, १ एप्रिल २०१० पासून बचत खात्यांवर, दैनंदिन उत्पाद धर्तीवर व्याज काढावे.
(३) भारतामधील रहिवाशांच्या बचत खात्यांवरील व्याजदरांचे डिरेग्युलेशन केले गेले असल्याने, ऑक्टोबर २५, २०११ पासून, बँकांना पुढील दोन अटींवर, बचत खाते ठेवींवरील स्वतःचे व्याजदर ठरविण्याचे स्वातंत्र्य देण्यात आले आहे.

(अ) सर्वप्रथम, खात्यात एक लक्ष रुपयांपर्यंतची कितीही रक्कम असली तरी बचत खाते ठेवीवर प्रत्येक बँकेला एक एकसमान व्याजदर द्यावा लागेल. अशा ठेवींवरील व्याज काढताना, दिवसाअखेर रुपये एक लाख शिल्लकेवर, बँकांनी ठरविलेला तो एकसमान व्याजदर लागु केला जावा.

(ब) दुसरे म्हणजे, दिवसाअखेरची शिल्लक एक लाख रुपयांपेक्षा अधिक असल्यास बँक निराळा व्याजदर देऊ शकते. मात्र अशा वेळी बँकेच्या कोणत्याही शाखेत त्याच तारखेस व त्याच मूल्याची स्वीकारलेली अन्य रक्कम ह्यावर दिल्या जाणा-या/देऊ केलेल्या व्याजदरासंबंधाने भेदभाव केला जाऊ नये.

(४) ठेवींवरील व्याजदर ठरविण्यासाठी बँकेने तिच्या संचालक मंडळाची/ॲसेट लायाबिलिटी मॅनेजमेंट समिती (मंडळाने तसे अधिकार दिले असल्यास) ह्यांची पूर्वमंजुरी घेणे आवश्यक आहे.

५) असे व्याज तिमाही किंवा अधिकतर कालावधीने दिले जावे. बचत खात्यावरील व्याज नियमितपणे जमा केले जावे मग ते खाते कार्यक्षम असो अथवा नसो.

## २.२ क) तरत्या दरांच्या ठेवी

देशांतर्गत मुदत ठेवींवर बँका, एखाद्या अँकर रेटशी स्पष्टपणे संबंधित असलेला तरता दर देऊ करु शकतात. ह्यात पारदर्शकता येण्यासाठी अशा तरत्या दराचे ठेव-उत्पाद देऊ करत असताना बँकांनी अंतर्गत किंवा साधित (डिराइव्हड्) दरांचा उपयोग करु नये. बँकांनी त्यांचे तरत्या दराचे ठेव उत्पाद देऊ करताना, ग्राहक पारदर्शकतेने थेट पाहू शकेल असे बाजार-आधारित रुपी बेंचमार्क दरच वापरावेत.

## २.२ ड) बँकांनी गोठविलेल्या खात्यांवर व्याज-प्रदान

अंमलबजावणी अधिकरणांच्या आदेशानुसार गोठविलेल्या ग्राहकांच्या मुदत ठेव खात्यांच्या बाबतीत बॅकांनी खाली दिलेली कार्यरीत अनुसरावी.

१) मुदत पूर्ण झाल्यावर, मुळ मुदती एवढेच मुदतीचे नुतनीकरण करण्याबाबतचे विनंतीपत्र ग्राहकाकडून घ्यावे. परिपक्वता झाल्यानंतर ग्राहकाकडून एक विनंतीपत्र घेण्यात यावे. नूतनीकरण करण्यासाठी ग्राहकाकडून विनंतीपत्र घेते वेळी, ती ठेव नूतनीकृत करावयाची मुदत देखील दर्शाविण्यास ग्राहकाला सांगण्यात यावे ग्राहकाने नूतनीकरणाची मुदत निवडण्याचा पर्याय न वापरल्यास बँका मूळ मुदती एवढ्याच मुदतीने त्या ठेवीचे नूतनीकरण करु शकतात.

२) ह्यासाठी नवीन पावती देण्याची आवश्यकता नाही. तथापि ह्या नूतनी करणाबाबत डिपॉझिट लेजरमध्ये योग्य नोंद करण्यात यावी.

३) अशा ठेवीचे नूतनीकरण केल्याबाबतचे पत्र, ग्राहकाला तसे कळवून, संबंधित सरकारी खात्याला रजिस्टर्ड लेटर / स्पीड पोस्ट / कुरियर सेवाद्वारे पाठविले जावे. ठेवीदाराला पाठविलेल्या पत्रात त्या ठेवीचे कोणत्या व्याजदराने नुतनीकरण केले आहे. तेही कळविण्यात यावे.

४) विनंतीपत्र मिळाल्याच्या तारखेपासून मुदतबाह्य काल १४ दिवसांपेक्षा अधिक झाला नसल्यास, परिपक्वतेच्या तारखेपासूनच नूतनीकरण करण्यात यावे. तो काल १४ दिवसांपेक्षा अधिक झाला असल्यास, त्या मुदतबाह्य कालासाठी, बँकांनी त्यांनी स्वीकारलेल्या धोरणानुसार व्याज द्यावे आणि ते व्याज एका व्याज-मुक्त वेगळ्या पोटखात्यात ठेवून, मूळ स्थिर ठेव परत करतेवेळी ते परत करावे.

ह्याशिवाय, अंमलबजावणी खात्याने गोठविलेल्या बचत खात्यांबाबत, बँकांनी त्यावरील व्याज नियमितपणे जमा करीत रहावे.

## २.३ स्थिर ठेवींवरील व्याज प्रदान : व्याज काढण्याची रीत

आयबीएद्वारा, सभासद बँकांनी अनुसरण्यासाठी, 'इंडियन बँक्स' असोशिएशन (आयबीए) कोड फॉर बँकिंग प्रॅक्टिस देण्यात आले आहेत, ह्या कोड्सचा उद्देश, किमान प्रमाणभूत कार्यरीतींमधून चांगल्या बँकिंग कार्यरीती अनुसरणे हा असून त्या सभासद बॅकांनी ग्राहकांबरोबरच्या व्यवहारात पाळाव्यात. देशांतर्गत मुदत ठेवींवरील व्याज काढण्यासाठी, आयबीएने विहित केले आहे की, जेथे ३ महिन्यांपेक्षाहि कमी काळात ठेव परत करावयाची आहे तेथे किंवा जेथे टर्मिनल तिमाही संपलेली नाही, तेथे संपूर्ण वर्ष ३६५ दिवसांचे आहे असे धरुन प्रत्यक्ष दिवसांचे व्याज दिले जावे. काही बँका लीप इयरचे / मध्ये ३६६ दिवस व इतर वर्षांचे ३६५ दिवस धरतात. बँकांना त्यांची रीत अनुसरण्याचे स्वातंत्र्य असले तरी त्यांनी ठेव स्वीकारतेवेळी त्यांच्या ग्राहकांना ह्याबाबत व व्याज काढण्याबाबतची माहिती द्यावी व ती माहिती शाखांमध्ये प्रदर्शितही करावी.

एखादी स्थिर ठेवीची पावती परिपक्व होऊनही ती रक्कम दिली गेली नसेल तर अशा हक्क न सांगितलेल्या बँकेतील रकमेवर बचत खात्याचे व्याज दिले जावे.

## २.४ आर्मी ग्रुप इन्शुअरन्स डायरेक्टरेट (एजीआयडी), नेव्हल ग्रुप इन्शुअरन्स फंड (एनजीआयएफ) आणि एअर फोर्स ग्रूप इन्शुअरन्स सोसायटी (एएफजीआयएस) यांना अतिरिक्त व्याज

केवळ वरील एजीआयडी, एनजीआयएफ व एएफजीआयएस ह्यांना, त्यांच्या २ वर्षे व त्यावरील मुदतीच्या मुदत ठेवींवर, रिझर्व बँकेने वेळोवेळी दिलेल्या निदेशांनुसार विहित केलेल्या व्याजदरांपेक्षा दरसाल १.२८ टक्के एवढे अतिरिक्त व्याज देण्यास सार्वजनिक क्षेत्रातील बँकेला परवानगी आहे. मात्र अशा ठेवी बँकेद्वारे विमाहप्त्यांशी संबंधीत नसाव्यात.

## २.५ बँकेचे कर्मचारी व त्यांचे विशेष संघ ह्यांच्या ठेवींवर एक टक्क्यापेक्षा अधिक नसलेले अतिरिक्त व्याज देण्याबाबत मुखत्यारी

ह्या परिपत्रकातील **जोडपत्र १ व जोडपत्र २** मध्ये विहित केलेल्या व्याजदरापेक्षा दरसाल १ टक्क्यापेक्षा अधिक नसलेले व्याज देण्यास बँकेला तसे वाटल्यास मुखत्यारी आहे. मात्र त्यासाठी पुढील अटी असतीलः-

२.५.१. पुढील प्रकारे बचत किंवा मुदत ठेव खाते उघडलेले असल्यास

अ) बँकेच्या कर्मचारी वर्गाचा सभासद किंवा सेवानिवृत्त कर्मचारी सभासद ह्याने स्वतः किंवा त्याच्या / तिच्या कुटुंबातील सभासदाबरोबर उघडलेले खाते. किंवा

ब) मृत बँक कर्मचारी सभासदाची पत्नी / पती किंवा मृत झालेला सेवानिवृत बँक कर्मचारी वर्ग सभासद आणि

क) बँकेच्या कर्मचारी वर्गाचे सभासद असलेल्या व्यक्तींचा संघ किंवा फंड

बँकेने संबंधित ठेवीदाराकडून घोषणापत्र घ्यावे की,त्यात ठेवलेले किंवा पुढे वेळोवेळी ठेवले जाणारे पैसे हे वरील परिच्छेद अ ते क मध्ये निर्देशिलेल्या ठेवीदाराचे आहेत.

२.५.२. उपपरिच्छेद २.५.१ साठी

१) "बँकेच्या कर्मचारी वर्गाचा सभासद" म्हणजे, पूर्ण वेळ किंवा अर्ध वेळ, नियमित धर्तीवर नोकरी दिली गेलेली व्यक्ती, ह्यात प्रोबेशनवर भरती केलेल्या व्यक्तीचा किंवा विशिष्ट काळासाठी कंत्राटावर नोकरी दिलेली किंवा प्रतिनिधी म्हणून नेमलेली व्यक्ती तसेच एकत्रीकरणाच्या योजनेमुळे घेतली गेलेली व्यक्ती ह्यांचाही समावेश होतो. परंतु प्रासंगिक (कॅजुअल) धर्तीवर नोकरी दिलेल्या व्यक्तींचा समावेश होत नाही.

अ) दुसऱ्या बँकेकडून प्रतिनिधित्वावर घेतल्या गेलेल्या कर्मचाऱ्यांबाबत, ते कर्मचारी ज्या बँकेकडून घेतले गेले आहेत, त्या बँकेला प्रतिनिधित्वाच्या काळात तिच्या मध्ये उघडलेल्या बचत किंवा मुदत ठेवी खात्यांवर अतिरिक्त व्याज देण्यास परवानगी आहे.

ब) निश्चित कालावधीसाठी प्रतिनिधित्वावर किंवा निश्चित काळाच्या कंत्राटावर घेतलेल्या व्यक्तींसाठी, हा लाभ, ते प्रतिनिधित्व किंवा कंत्राट संपल्यावर मिळणे बंद होईल.

२) "बँकेच्या कर्मचाऱ्यांचा सेवानिवृत्त सभासद" म्हणजे, बँकेच्या सेवा / कर्मचारी विनियमांनुसार सुपरॲन्युएशन किंवा अन्य रीतीने सेवानिवृत्त झालेल्या कर्मचारी, पण ह्यात सक्तीने सेवानिवृत्त केलेल्या किंवा शिस्तीच्या/कायदेशीर कारवाईमुळे निवृत्त केलेल्या कर्मचाऱ्यांचा समावेश होत नाही.

३)  "कुटुंब" म्हणजे, बँकेच्या कर्मचारी वर्गाच्या सभासदाची पती/पत्नी बँकेच्या कर्मचारी वर्गाचा सेवानिवृत्त सभासद आणि अशा सभासदांवर/निवृत्त सभासदावर अवलंबून असलेली सभासदाची मुलेबाळे, आईवडील, भाऊ-बहिण, तथापि ह्यात कायदेशीर फारकत घेतलेल्या पती / पत्नीचा समावेश होत नाही.

२.५.३.अतिरिक्त व्याजाचे प्रदान पुढील अटींवर अवलंबून आहे : -

१) अतिरिक्त व्याजाचे प्रदान, ती व्यक्ती त्यासाठी पात्र असेपर्यंतच आणि अशी पात्रता संपली असल्यास मुदत ठेव खाते परिपक्व होईपर्यंत करता येईल.

२) एकत्रिकरणाच्या योजनेखाली स्वीकारलेल्या कर्मचाऱ्यांबाबत अतिरिक्त व्याज दिले जाणे, हे कंत्राटीय दर अधिक अतिरिक्त व्याजदर हा, ते कर्मचारी त्या बँकेकडून मुळात नोकरीस ठेवले गेले असताना दिल्या जाणाऱ्या व्याजदरापेक्षा अधिक नसल्यासच देण्यास परवानगी दिली जाईल.

२.५.४. ज्या फेडरेशन्समध्ये बँकेतील कर्मचारी हे थेट / प्रत्यक्ष सभासद नसतील अशा बँक कमर्चारी फेडरेशन्स अतिरिक्त व्याजासाठी पात्र नाहीत.

२.५.५.देशांतर्गत ठेवींबाबत बँकांनी त्यांच्या वरिष्ठ नागरिक असलेल्या सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना, ते बँकेचे निवृत्त कर्मचारी असल्याने एक टक्क्यापेक्षा जास्त दिल्या जाणाऱ्या अतिरिक्त व्याजा व्यतिरिक्त, ज्येष्ठ नागरिकांना दिल्या जात असणारे अधिकतर व्याजदर दिल्यास अधिक चांगले.

२.५.६ कर्मचाऱ्यांच्या (सध्याच्या किंवा निवृत्त) अनिवासी (बाह्य) ठेवींच्या बाबतीत, ते बँक- कर्मचारी असल्याने दिल्या जाणाऱ्या अतिरिक्त व्याजासह दिले जाणारे व्याज आरबीआयने ठरविलेल्या मर्यादेच्या बाहेर असू नये.

## २.६ बँकेचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक व कार्यकारी संचालक ह्यांच्या ठेवींवर एक टक्क्यापेक्षा अधिक नसलेले अतिरिक्त व्याज देण्याची मुखत्यारी

निश्चित कालावधीसाठी नेमलेले बँकेचे अध्यक्ष, व्यवस्थापकीय संचालक व कार्यकारी संचालक ह्यांच्याकडून स्वीकारलेल्या / नुतनीकरण केलेल्या ठेवींवर, ह्या परिपत्रकातील **जोडपत्र १ व २** मध्ये विहित केलेल्या व्याजदराव्यतिरिक्त, दरसाल एक टक्क्यापेक्षा अधिक नसलेले अतिरिक्त व्याज बँकांना तसे वाटल्यास त्या देऊ शकतात. तथापि वरील परिच्छेद २.६ खाली मिळणारा हा लाभ त्यांच्या नेमणुक कालावधीपुरताच मर्यादित असेल.

## २.७ प्रायोजक बँकां बरोबर प्रादेशिक ग्रामीण बँकांनी ठेवलेल्या चालु खात्यांवर व्याज देण्याबाबतची मुखत्यारी

बँकांनी प्रायोजित केलेल्या प्रादेशिक ग्रामीण बँकांच्या चालु खात्यांवर बँका व्याज देऊ शकतात. तथापि, आरआरबीज्नी बँकांकडे ठेवलेल्या चालु खात्यांवर व्याज देण्यास बँकांना प्रोत्साहन देण्यात येत नाही.

## २.८ एखाद्या शेतकऱ्याच्या संयुक्त (कॉंपोझिट) कॅश क्रेडिट खात्यामधील किमान शिल्लक रक्कमेवर व्याज देण्याची मुखत्यारी

एखाद्या शेतकऱ्याच्या कॉंपोझिट कॅश क्रेडिट खात्यातील किमान जमा रकमेवर, प्रत्येक कॅलेंडर महिन्याच्या १० तारखेपासून ते शेवटच्या तारखेपर्यंतच्या कालावधीसाठी, बँकेच्या दृष्टिकोनानुसार व इतर संबंधित घटकांनुसार असलेल्या दराने बँक तिला वाटल्यास व्याज देऊ शकते.

## २.९ ज्येष्ठ नागरिकांसाठी ठेव-योजना

१) बँकांना, त्यांच्या संचालक मंडळाच्या मंजुरीने, खास निवासी भारतीय ज्येष्ठ नागरिकांसाठी नेहमीच्या कोणत्याही आकाराच्या ठेवींच्या तुलनेने उच्चतर व ठरीव व्याजदर द्यावयाच्या ठेव-योजना तयार करण्याची परवानगी देण्यात आली आहे. ह्या योजनांमध्ये, अशा ठेवीदाराचा मृत्यू झाल्यास ती ठेव आपोआपच त्याच्या नामनिर्देशिताकडे हस्तांतरित करण्याबाबत सुलभ कार्यरीती समाविष्ट असाव्यात. वरील अतिरिक्त व्याज कोणत्याही अकारच्या अनिवासी ठेवींना लागु नाही.

२) एखाद्या एचयुएफच्या नावे असलेल्या मुदत ठेवींबाबत, त्यातील कर्ता हा वरिष्ठ नागरिक असला तरीही त्याला उच्चतर व्याजदर देता येणार नाही. कारण त्या ठेवीचा लाभार्थी हा एचयुएफ आहे व वैचारिकरित्या कर्ता नाही.

## २.१० मुदत ठेवीची मुदतपूर्व निकासी

१) ठेवीदाराने विनंती केल्यास, बँकेने, ती ठेव ठेवतेवेळी ठरविलेल्या मुदतीच्या आधिच तिची निकासी करण्यास मान्यता द्यावी. मुदतठेवीची मुदतपूर्व निकासी केल्यामुळे आकारावयाचे दंडात्मक व्याज ठरविण्यास बँकांना स्वातंत्र आहे. ठेवीवरील व्याजदराबरोबरच मुदतपूर्व निकासीसाठी आकारवयाच्या व्याजाबाबत ठेवीदाराला जाणीव करुन दिली असल्याची खात्री बँकांनी करुन द्यावी. एखादी ठेव मुदतीच्या पूर्वीच काढून घेत असताना, ती ठेव बँकेकडे असलेल्या कालावधीसाठी द्यावयाचे व्याज हे त्या कालावधीसाठी लागु असलेल्या व्याजदरा नेच दिले जावे करारानुसार असलेल्या दराने नव्हे. विहित केलेल्या किमान कालावधीच्या आधीच ठेवीची निकासी केली गेल्यास कोणतेही व्याज देता येणार नाही. तथापि, बँकेला तसे वाटल्यास, व्यक्ती किंवा अविभक्त हिंदु कुटुंबे सोडल्यास अन्य संस्थानी ठेवलेल्या मोठ्या रकमांच्या ठेवींची मुदतपूर्व निकासी करण्यास बँका परवानगी देऊ शकतात. तथापि, अशा ठेवी स्वीकारते वेळी, बँकेने अशा ठेवीदारांना, मुदतपूर्व निकासी करता येणार नाही असे कळवावे.

२) विदेश मुद्रा खात्यात (आरएफसी) रुपांतरण करण्यासाठी एनआरई मुदत ठेवींची मुदतपूर्व निकासी करण्याबाबत बँकानी मुदतपूर्व निकासी साठी कोणतेही दंड आकारु नये. अशी ठेव किमान १ वर्षाच्या कालावधीत बँकेत राहिली नसल्यास, बँक तिला तसे वाटल्यास, आरएफसी खात्यातील बचत ठेवींवर लागु असलेल्या व्याजदरापेक्षा जास्त नसलेल्या व्याजदराने त्यावर व्याज देईल. मात्र एनआरई खातेदाराने अशा रुपांतरणाबाबतची विनंती भारतात परतल्यावर लगेच केली पाहिजे.

३) परिपक्वतेपूर्वीच एनआरई ठेवीचे एफसीएनआर (बी) ठेवींमध्ये रुपांतरण व त्या उलट केलेल्या रुपांतरणाला मुदतपूर्व निकासीची दंडात्मक तरतुद लागु केली जावी.

४) परिपक्वतेपूर्वीच एनआरएसआर / एनआरएनआर ठेवींचे एनआरओ ठेंवीचे केलेल्या रुपांतरणाला, मुदतपूर्व निकासीची दंडात्मक तरतुद लागु होईल.

५) १ एप्रिल २००२ पासून एनआरएनआर / एनआरएसआर योजना बंद केल्याचे विचारात घेता, एनआरएनआर ठेवीं, परिपक्व झाल्यावर, त्यांचे उत्पन्न एनआरई खात्यात जमा केले लागू शकते, पण एफसीएनआर (बी) खात्यात जमा केले जाऊ शकत नाही. आणि एनआरएसआर ठेवी परिपक्व झाल्यावर त्यांचे उत्पन्न केवळ मुदतपूर्व निकासी केल्यास त्यांचे उत्पन्न केवळ एनआरओ खात्यातच जमा केले जावे.

## २.११ मुदत ठेवीमध्ये गुंतवणुक करण्यासाठी, मुदतठेव, रोजची ठेव ह्या स्वरुपातील ठेव किंवा आवर्ती ठेव ह्यांचे रुपांतरण

ठेवीदाराने विनंती केल्यास, बँकेने त्या ठेवीदाराला त्याच बँकेत दुसऱ्या एखाद्या मुदत ठेवीत ताबडतोब गुंतवणुक करण्यासाठी, त्याची मुदत ठेव, रोजच्या ठेवीच्या स्वरुपातील ठेव किंवा आवर्ती ठेव, ह्यातील रक्कमांचे रुपांतरण करण्यास परवानगी द्यावी. अशा प्रकारच्या मुदत ठेवींच्या बाबतीत एप्रिल १९,

२०१० पर्यंतच्या काळासाठी, अशा मुदत ठेवींच्या बाबतीत, दंडस्वरुपाने व्याज कमी न करता व्याज प्रदान करणे बँकांना आवश्यक होते. मात्र ह्यासाठी त्या रकमांची पुनर्गुंतवणुक त्याच बँकेत व पूर्वीच्या ठेवींच्या मुदतीपेक्षा आधिकतर मुदतीसाठी केली गेली असावी. तथापि, पुनरावलोकनानंतर आणि अधिक चांगल्या ॲसेट-लायाबिलिटी मॅनेजमेंटसाठी (एएलएम), २० एप्रिल २०१० पासून, ठेवींचे रुपांतरण करण्यासाठी स्वतःचीच धोरणे तयार करण्याची परवानगी बँकांना देण्यात आली आहे.

## २.१२ मुदतबाह्य (ओव्हरड्यु) ठेवींचे नुतनीकरण

वैयक्तिक बँकांनी, ह्याबाबतीत त्यांच्या संचालक मंडळाने ठरविलेल्या धोरणानुसार, मुदतबाह्य झालेल्या ठेवींच्या नुतनीकरणाबाबत सर्व बाबी ठरवून, ठेवी स्वीकारतेवेळी, नुतनीकरणासंबंधीच्या अटी व शर्ती, व्याजदर इत्यादी ग्राहकांना कळवावेत. असे धोरण मुखत्यारी रहित (नॉन-डिस्क्रीशनरी) व भेदभाव नसलेले असावे.

## २.१३ मुदतठेवींविरुध्द अग्रिमराशी-व्याज आकारण्याची रीत

अ) जेव्हा एखाद्या मुदतठेवी विरुध्द अग्रिमराशी दिली जाते व ती ठेव पुढील प्रमाणे ठेवलेली असते.

१) एकच किंवा संयुक्त कर्जदार.
२) भागीदारी कंपनीचा एक भागीदार व त्या कंपनीला अग्रिमराशी दिली जाते.
३) एखाद्या मालकी कंपनीचा मालक/चालक व अग्रिमराशी त्या कंपनीला दिले आहे.
४) एखादा पाल्य, ज्याला पालक त्या पाल्याच्या वतीने कर्ज घेण्यास सक्षम आहे व अशा नात्याने त्या पाल्याच्या पालकाला अग्रिमराशी दिली जाते. तेव्हा, बेंचमार्क प्राईम लेंडिंग रेट (बीपीएलआर) विचारात न घेताही बँक व्याजदर आकारु शकते. ह्यात एनआरई मुदतठेवींविरुध्द घेतलेल्या व विदेशी मुद्रेत किंवा रुपयांमध्ये परत केलेल्या अग्रिमराशींचा समावेश आहे.
ज्याच्या विरुध्द अग्रिमराशी घेतली आहे अशी मुदत ठेव, विहित केले किमान परिपक्वता काल संपण्यापूर्वीच काढून घेतली गेल्यास, अशी अग्रिमराशी ही त्या मुदत ठेवीविरुध्द घेतली गेल्याचे समजण्यात येऊ नये व त्यावरील व्याज हे भारतीय रिझर्व बँकेने अग्रिमराशींवरील व्याजाबाबत वेळोवेळी विहित केलेल्या निदेशानुसार आकारण्यात यावे.

ब) एनआरई बचत ठेव खात्याचा खातेदार ती बचत ठेव कोणत्याही वेळी काढू शकतो आणि ह्यासाठी बँकांनी अशा ठेवींविरुध्द कोणत्याही प्रकारचे, प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष लिएन ठेवू ठेवू नये. (देशांतर्गत बचत ठेवींच्या बाबतीत बँकांनी आयबीएने दिलेली मार्गदर्शक तत्वे/ त्यांच्या संचालक मंडळाने ह्याबाबत मंजुर केलेल्या कार्यरीतीचे पालन करावे.)

## २.१४ मुदत ठेवीविरुध्द दिलेल्या अग्रिम राशीवर मार्जिन

मुदत ठेवीविरुध्द दिलेल्या अग्रिम राशीवर मार्जित बाबतचा निर्णय प्रत्येक बँकेवर सोपविला आहे. मात्र ह्याबाबत त्यांच्या संचालक मंडळाने पारदर्शक धोरण ठरविले असावे.

## २.१५ एनआर(ई) आरए ठेवींविरुध्द द्यावयाच्या अग्रिम राशींवरील निर्बंध-कर्जाचे आकारमान प्रमाण

२००६-०७ सालच्या, नाणेविषयक धोरणाच्या वार्षिक निवेदनाच्या (परिच्छेद ८६) तिसऱ्या तिमाही पुनरावलोकनात सांगण्यात आले होते की वैयक्तिक अनिवासी भारतीयांना (एनआरआय) ह्या सुविधा उपलब्ध करुन देण्याचे उद्दिष्ट नजरेसमोर ठेवून आणि सध्याच्या नाणेविषयक परिस्थितीचा विचार करता, ह्या सुविधेचा ऊपयोग केल्यास, संवेदनशील क्षेत्रातील मालमत्तेच्या किंमतीत वाढ होणे टाकली जाऊ शकते. ह्यासाठी ठेवीदारांना किंवा तिसऱ्या पक्षांना, एनआर(ई) आरए व एफसीएनआर(बी)

ह्यांच्या ठेवींविरुध्द रु वीस (२०) लक्षांपेक्षा अधिक रकमेची नवीन कर्जे किंवा अस्तित्वात असलेल्या कर्जांचे नुतनीकरण करण्यास बँकांना मनाई करण्यात आली होती. २००९-१० सालच्या वार्षिक धोरण निवेदनात (परिच्छेद १११) घोषित केल्याप्रमाणे, ठेवीदार किंवा तिसऱ्या पक्षांना, एनआर(ई) आरए व एफसीएनआर(बी) ह्यांच्या ठेवींच्या प्रतिभूतीविरुध्द, रु २० लाक्षांची मर्यादा आता रु १०० लक्षांपर्यंत वाढविण्यात आली आहे. त्यानुसार, जुलै २८, २००९ पासून बँकांनी, एनआर(ई) आर ए ठेवींविरुध्द, ठेवीदारांना किंवा तिसऱ्या पक्षांना रु १०० (शंभर) लक्षांपेक्षा आधिक रकमेची नवीन कर्जे किंवा अस्तित्वात असलेल्या कर्जांचे नूतनीकरण करु नये. ह्या मर्यादेला बगल देण्यासाठी बँकांनी कर्ज रकमेचे कृत्रिम भाग करु नयेत.

## २.१६ मृत ठेवीदाराच्या ठेवखात्यावर द्यावयाचे व्याज

अ)

१) मृत झालेला वैयक्तिक ठेवीदार किंवा

२) दोन किंवा अधिक संयुक्त ठेंवीदारांपैकी एक ठेवीदार मृत ह्यांच्या नावे मुदतठेव असल्यास, अशा बाबतीत ठेवीदार मृत झाल्यास, परिपक्व झालेल्या ठेवीवर व्याज देण्याबाबतचे धोरण बँकांबरच सोपविण्यात आले आहे. मात्र अशा बाबतीत बँकांच्या संचालक मंडळाने पारदर्शक धोरण ठेवलेले असावे.

ब) एखाद्या वैयक्तिक मृत ठेवीदाराच्या/एकमेव मालकीच्या कंपनीच्या नावे असलेल्या चालु खात्यात असलेल्या शिल्लक रकमेबाबत त्यावरील व्याज केवळ १ मे १९८३ पासून किंवा त्या ठेवीदाराच्या मृत्युच्या तारखेपासून (जे नंबर असेल ते), हक्कदारांना पुनर्प्रदान करण्याच्या तारखेपर्यंत, त्या तारखेस असलेल्या बचत खात्याच्या व्याजदराने दिले जावे.

सूचना - एनआरई ठेवीच्या बाबतीत, जेथे हक्कदार निवासी असतील तेव्हा, ती ठेव परिपक्व झाल्यावर तिला देशांतर्गत रुपये ठेव समजले जावे व त्या काळासाठी द्यावयाचे व्याज हे त्याच परिपक्वतेच्या देशांतर्गत ठेवीला लागु असलेल्या व्याजदराने दिले जावे.

## २.१७ ठेवींवरील व्याजातील बदल आणि व्याजदरांच्या निरनिराळ्या टप्प्यांनुसार ठेवींचे विभाजन आरबीआयला कळविणे.

सप्टेंबर १९९७ मध्ये दिलेल्या सुचनांनुसार, जेव्हा जेव्हा ठेवींवरील दरांची रचना व पीएलआर सुधारित केल्या जातात, तेव्हा त्याबाबत रिझर्व बँकेच्या, डिपार्टमेंट ऑफ बँकिंग ऑपरेशन्स व डेव्हलपमेंट विभागाला (डीबीओडी) विहित नमुन्यात (मॅन्युअल ऑफ इन्ट्रक्शन्स, डीबीओडी क्र ७) बँकांनी कळविणे आवश्यक असते. तथापि, बँका त्याबाबत आरबीआयच्या नाणे विषयक धोरण विभागाला कळवित असल्याने डीबीओडीला सादर करणे खंडित करण्यात आले आहे.

## २.१८ संयुक्त खातेदार / खातेदारांच्या नावात भर घालणे / खोडणे

तशीच परिस्थिती उद्‌भविल्यास, सर्व संयुक्त खातेदारांच्या विनंतीनुसार, त्या संयुक्त खातेदारांच्या नावात भर घालण्याचे / खोडण्याचे काम बँका करु शकतात किंवा वैयक्तिक / एकच खातेदाराला दुसऱ्या एखाद्या व्यक्तीचे नाव संयुक्त खातेदार म्हणून घालण्यास परवानगी देऊ शकतात. तथापि, ती ठेव मुदत ठेव असल्यास कोणत्याही परिस्थितीत मूळ ठेवीच्या रकमेत किंवा मुदतीत बदल केल जाऊ नये.

बँकेला तसे वाटल्यास, व एखाद्या ठेव-पावतीच्या सर्व संयुक्त खातेदारांच्या विनंतीनुसार, ती त्या संयुक्त ठेवीचे, फक्त प्रत्येक संयुक्त खातेदाराच्या नावे विभाजन / भाग पाडू शकते. मात्र ह्यासाठी एकूण ठेव व मुदत ह्यात बदल केला जाऊ नये.

एखाद्या अनिवासी व्यक्तीबरोबर संयुक्तपणे निवासी खाते उघडणे आणी निवासी व्यक्तीबरोबर संयुक्तपणे एनआरई खाते उघडणे ह्यासाठी एफईडी, आरबीआय ह्यांनी वेळोवेळी दिलेल्या सूचना लागु होतील.

## २.१९ व्यवहारांचे "राउंडिग ऑफ"

ठेवींवरील व्याज देणे / अग्रिम राशींवर व्याज आकारणे ह्यासह सर्व व्यवहार जवळच्या रुपयापर्यत रुपयापर्यत राउंड ऑफ करावेत, म्हणजे, ५० व त्यावरील पैसे हे जवळच्या वरील रुपयापर्यंत व ५० पैशा खालील पैशांकडे दुर्लक्ष केले जाईल. रोख प्रमाणपत्रांची प्रचालन-मूल्ये देखील ह्याच प्रकारे राउंड ऑफ केली जावीत.

अहमदाबाद, गुजराथमधील उच्च न्यायालयाच्या निवाडयाच्या आधारे बँकांना सल्ला देण्यात आला होता की, त्यांच्या ग्राहकांनी रुपयांचे भाग असलेले चेक्स/ड्राफ्टस त्यांनी फेटाळू नयेत. ह्याबाबतीत अनुसरत असलेल्या कार्यरितींचे बँकांनी पुनरावलोकन करावे आणि अंतर्गत परिपत्रके इत्यादींच्या मार्फत त्यांच्या कर्मचाऱ्यांना ह्याबाबतची पूर्ण महिती झाली असल्याची खात्री करुन घ्यावी की ज्यामुळे सर्वसाधारण जनतेला त्रास होणार नाही. ह्याशिवाय, बँकांनी खात्री करुन घ्यावी की, अंशात्मक रुपया असलेले चेक्स/ड्राफ्टस न स्वीकारणाऱ्या कर्मचाऱ्यांविरुध्द योग्य ती कारवाई केली जाईल. वरील सूचनांचे उल्लंघन करणाऱ्या बँकिंग रेग्युलेशन अधिनियम, १९४९ मधील तरतुदीखाली दंडात्मक कारवाईस पात्र ठरतील.

## २.२० मुदत ठेवीची पावती देणे

बँकांनी मुदत ठेवीच्या पावत्या द्याव्यात व त्यात, दिव्याची तारीख, ठेवीची मुदत, परिपक्वतेची तारखी, लागु असणारा व्याजदार इत्यादी संपूर्ण महिती द्यावी.

## २.२१ रविवार / सुटीचा दिवस /कामकाज न करावयाचा कामाचा दिवस / ह्या दिवशी परिपक्व होणाऱ्या मुदत ठेवीवर व्याज प्रदान

पुनर्-निवेश ठेवी व आवर्ती ठेवींच्या बाबतीत, बँकांनी परिपक्वतेच्या मूल्यावर, मध्येच येण्यारा (इंटरव्हेनिंग) रविवार / सुटी / कामकाज न करावयाचा कामाचा दिवस (एनआरई ठेवींसाठी शनिवार) ह्या दिवसाचेही व्याज द्यावे. तथापि सर्वसाधारण ठेवींच्या बाबतीत मात्र, रविवार / सुटी / कामकाज न करावयाचा कामाचा दिवस ह्यांच्यासाठी (एनआरई ठेवींबाबत शनिवार) बँकांनी मूळ मुदल रकमेवर व्याज द्यावे.

## २.२२ अ - ठेवीच्या मोबिलायझेशनसाठी योजना

बॅकांनी त्यांच्या नवीन देशांतर्गत ठेवी मोबिलायझेशनसाठी योजना सुरु करण्यासाठी इंडियन बँक्स असोशिएशनचे पूर्व-मतैक्य किंवा आरबीआयची पुर्वपरवानगी घेणे आवश्यक नाही. तथापि, अशा नविन देशांतर्गत ठेवी मोबिलायझेशन योजना त्यांच्या संचालक मंडळाच्या मंजुरीने प्रत्यक्ष सुरु करण्यापूर्वी, बँकांनी खात्री करुन द्यावी की, ठेवींवरील व्याजदार, ठेवींची मुदतपूर्व निकासी, मुदत ठेवींविरुध्द मंजुर केलेली कर्जे/अग्रिम राशी इत्यादी बाबत आरबीआयने वेळोवेळी दिलेल्या निदेशांचे काटेकोरपणे पालन केले जात आहे. ह्याबाबतीत केलेले उल्लंघन गंभीरपणे घेतले जाईल आणि ते, बँकिग रेग्युलेशन अधिनियम, १९४९ खाली दंडात्मक कारवाईसाठी पात्र ठरु शकते.

## २.२२ ब-लॉकइन कालावधी असलेले विशेष मुदतठेव उत्पाद

काही बँका नियमित मुदतठेवींबरोबर, त्यांच्या ग्राहकांना ३०० दिवस ते ५ वर्षे पर्यंतचे विशेष मुदत ठेव उत्पाद देऊ करत होत्या. त्यांचे गुणविशेष पुढीलप्रमाणे होते.

१) ६ महिने ते १२ महिनेपर्यंतचे लॉकइन कालावधी

२)	लॉकइन कालावधीमध्ये मुदतपूर्व निकासी करण्यास परवानगी नाही. लॉकइन कालावधीमध्ये निकासी केल्यास व्याज दिले जाणार नाही

३)	अशा ठेवींवर दिले जाणारे व्याजदर सर्वसाधारण ठेवींवरील व्याजदारांप्रमाणे असणार नाहीत.

४)	काही विशिष्ट अटींवर, काही बँकाची, अंशतः पूर्व-प्रदान करण्यास परवानगी आहे.

वरील प्रमाणे गुणविशेष असलेल्या व लॉकइन कालावधी असलेल्या विशेष योजना काही बँकांनी सुरु केल्या होत्या. परंतु त्या योजना आम्ही दिलेल्या निदेशांनुसार नसल्याने अशा योजना बंद करण्यास त्या बँकांना सांगण्यात आले.

### २.२३ बचत खात्यातील किमान शिल्लक

खाते उघडतेवेळी बँकांनी त्यांच्या ग्राहकांना, त्या खात्यात किमान शिल्लक ठेवण्याबाबत व ती न ठेवल्यास त्यासाठी आकारले जाणारे शुल्क ह्याबाबत पारदर्शक रीतीने सांगावे. त्यानंतर लावलेला आकार सर्वच ठेवीदारांच्या बाबतीत एक महिन्याची नोटिस देऊन पारदर्शकतेने कळविला जावा. विहित केलेली किमान शिल्लक व ती न ठेवल्यास त्यासाठी लागू होणारा आकार ह्यात बदल झाल्यास बँकानी त्याबाबत त्यांच्या अस्तित्वात असलेल्या खातेदारांना किमान एक महिना आधी कळवावे.

### २.२४ नो - फ्रिल्स खाते

आधिकतर वित्तीय समावेश करण्याचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी, लोकसंख्येच्या आधिकतर मोठ्या घटकांना अशा खात्यांचा लाभ घेता यावा ह्यासाठी सर्व बँकानी, अत्यंत कमी किंवा “शून्य” किमान शिल्लक ठेवता येणारे व अशा लोकांना परवडण्या सारखे आकार असलेले नो फ्रिल्स अकाउंट्स उपलब्ध करुन द्यावेत. अशा खात्यांवरील व्यवहारांची तऱ्हा व संख्या सीमित असली तरी ग्राहकांना त्यांची आधीच जाणीव. करुन दिली जावी. अशा नो फ्रिल्स अकाउंट्सच्या सुविधांना बँकांनी स्थानिक माध्यमांसह, भरपुर प्रसिध्दी द्यावी व त्यात सुविधा व आकारांबाबत पारदर्शक रीतीने माहिती द्यावी.

बँकांनी केलेल्या प्रयत्नांमुळे सामान्य माणसालाही बँकखाते उघडणे शक्य झाले आहे. तथापि, देशाच्या कानाकोपऱ्यात बँकिंगची सोय केल्याखेरीज वित्तीय समावेशाचे उद्दिष्ट पूर्णपणे साध्य होणार नाही. हे सर्व परवडण्यासारख्या साधन-सामुग्रीने व कार्यकारी खर्च कमी ठेवून व सुयोग्य तंत्रज्ञानाचा वापर करुनच केले गेले पाहिजे. ह्यामुळे छोटे व्यवहार सफलक्षम करण्यासाठी, व्यवहारांना येणारा खर्च कमी करण्यास बँकांना मदत होणार आहे. काही बँकांनी देशाच्या काही दूरच्या भागात स्मार्ट कार्ड्स/ मोबाईल तंत्रज्ञानाचा ऊपयोग करुन शाखांमार्फत दिल्या जाणऱ्या सेवा देण्यासाठी काही विशिष्ट नमुना प्रकल्प आधीच सुरु केले आहेत. ह्यासाठी योग्य अशा तंत्रज्ञानाचा वापर करुन वित्तीय समावेशनाचे प्रयत्न अधिक वाढवावेत असे बँकांना सांगण्यात येत आहे. मात्र येथे काळजी घेतली जावी की ह्यासाठी योजिलेले उपाय १) अत्यंत सुरक्षित २) हिशेब तपासणी करण्याजोगे आणि ३) निरनिराळ्या बँकांनी स्वीकारलेल्या प्रणालींमध्ये आंतर-कार्यशीलता येण्यासाठी असलेल्या सर्व-स्वीकृत अशा खुल्या मानकांनुसार असावेत.

### २.२५ सूट (एक्झेंप्शन)

वरील परिच्छेदांमधील तरतुदी पुढील बाबींसंबंधाने लागु होणार नाहीतः

१)	बँकेला मिळालेली ठेव : -

अ)	कॉल / नोटिस /टर्म मनी मार्केटमध्ये धनको व ऋणको अशा दोन्हीही नात्यांनी भाग घेण्यासाठी परवानगी प्राप्त संस्थांकडून म्हणजेचे अनुसूचित डीलर्स कडून

मिळालेली ठेव. उदा. - सर्व अनुसूचित वाणिज्य बँका (आरआरबी सोडून), सहकारी बँका व प्राथमिक डीलर्स

ब) ज्यासाठी पार्टिसिपेशन प्रमाणपत्र दिले आहे अशी ठेव.

क) विदेश मुद्रा (अनिवासी) खाते (बँक्स) योजना, निवासी विदेशी मुद्रा खाते व एक्सचेंज अर्नर्स विदेशी मुद्रा खात्या कडून मिळालेली ठेव.

ड) आयकर आधिनियमन, १९६१ चे कलम ५४ चे उपकलम (२), कलम ५४ बी चे उपकलम (२), कलम ५४ डी चे उपकलम (२), कलम ५४ एफ चे उपकलम (४), आणि कलम ५४ जी चे उपकलम (२) अनुसार भारत सरकारने तयार केलेल्या कॅपिटल गेन्स अकाउंट योजना, १९८८ खाली मिळालेल्या ठेवी आणि-

ई) सर्टिफिकेट ऑफ डिपॉझिट खाली मिळालेल्या ठेवी

२) चेक्स, ड्राफ्ट्स, बिले, टेलिग्राफिक / मेल ट्रान्स्फर्स ह्यासारख्या बाहेरगावचे संलेख उशीराने गोळा केल्यामुळे दिलेले व्याज

## २.२६ मनाई

कोणत्याही बँकेने पुढील गोष्टी करु नयेत :

अ) वरील परिच्छेद २.७ व २.१६ (ब) मधील तरतुदी व्यतिरिक्त चालु खात्यांवर व्याज देणे.

ब) बँकेच्या कर्जदारांनी ठेवलेल्या चालु खात्यांवर काउंटरव्हेईलिंग व्याज देणे.

क) त्याच तारखेस व त्याच परिपक्वतेसाठी स्वीकारलेल्या दोन ठेवींमध्ये, त्या ठेवींवर दिल्या जाणाऱ्या व्याजाबाबत भेदभाव करणे. मग त्या ठेवी त्याच कार्यालयात किंवा त्या बँकेच्या अन्य कार्यालयात स्वीकारलेल्या असोत. ह्याला अपवाद म्हणजे भारतीय रहिवासी असलेल्या वरिष्ठ नागरिकांसाठी खास तयार केलेल्या व सर्वसाधारण ठेवींपेक्षा अधिक व ठरीव व्याजदर देणाऱ्या ठेवी योजना आणि ठेवींच्या आकारमानानुसार निरनिराळे व्याजदर लागु होणाऱ्या एकच मुदतीच्या रु १५ लाख व अधिक रकमेच्या ठेवी. असे निरनिराळे व्याजदर देण्यासाठी परवानगी पुढील अटी लागु आहेत.

१) त्याच परिपक्वतेच्या ठेवींवर निरनिराळे व्याजदर देण्याची परवानगी, एकच मुदत असलेल्या रु १५ लाख व अधिक रकमेच्या ठेवींसाठी लागु आहे. ह्यासाठी बॅकांनी रु १५ लाख किंवा अधिक ठेवींसाठी तोच व्याजदर किंवा निरनिराळे व्याजदर देऊ करावेत. ह्याबाबतीत, येथे स्पष्ट करण्यात येत आहे. भारत सरकारने त्यांची अधिसूचना क्र. २०३/२००६, जुलै २८, २००६ अनुसार घोषित केलेल्या, बँक टर्म डिपॉझिट स्कीम २००६ च्या आधारावर, बँकांनी, स्वतःच तयार केलेल्या ठेव-योजनांवर, त्याच मुदतीच्या इतर ठेवींच्या तुलनेत अधिक/विभेदक व्याजदर देणे बॅकांसाठी योग्य नाही.

कॅपिटल गेन्स अकाउंट्स योजना, १९८८ खाली मिळालेल्या ठेवींवर अधिकतर/ डिफरंशियल दर देऊ करणे बँकांसाठी योग्य ठरणार नाही.

२) विभेदक (डिफरंशियल) व्याजदर दिल्या जाणाऱ्या ठेवींसह इतर ठेवींवर दिले जाणारे व्याजदरांचे शेड्युल बँकांनी आधीच स्पष्टपणे प्रसिध्द करावेत. बँकांद्वारे दिले जाणारे व्याज ह्या शेड्युलनुसार असावे व ठेवीदार व बँक ह्यांच्यामधील वाटाघाटीनुसार असू नयेत.

ड) कोणतीही व्यक्ती, संस्था, कंपनी, संघ, किंवा अन्य कोणत्याही व्यक्ती ह्यांना कमिशन, किंवा देणगी/भेट ह्यांच्या स्वरुपात त्या ठेवींवर प्रोत्साहनार्थ दलाली कोणत्याही प्रकारात/स्वरुपात देणे. ह्याला अपवाद म्हणजेः-

१) खास / विशेष योजनेसाठी दारोदार ठेवी गोळा करण्यासाठी नेमलेल्या एजंटांना दिले जाणारे कमिशन, बिनसरकारी संस्था (एनजीओ) / स्वयंसेवी गट (एसएचजी) / मायक्रो फायनान्स संस्था (एमएफआय) आणि अन्य नागरी समाज संस्था (सीएसओ) ह्यांच्या सेवा, बिझिनेस फॅसिलिटेटर आणि बिझिनेस कॉरेस्पाँडंट मॉडेल्स ह्यांच्या द्वारे, ठेवी गोळा करण्यासह, वित्तीय व बँकिंग सेवा देण्यासाठी उपयोगात आणण्यास बँकांना परवानगी देण्यात आली आहे. अशा बिझिनेस फॅसिलिटेटरर्स /कॉरेस्पाँडंट्सना बँका वाजवी कमिशन / शुल्क देऊ शकतात व त्याबाबतचे दर व आकारमान ह्यांचे नियतकालिक पुनरावलोकन करु शकतात. बिझिनेस फॅसिलिटेटरर्स / कॉरेस्पाँडंट्स ह्यांच्या बरोबर केलेल्या करारात, त्यांनी बँकेच्या वतीने दिलेल्या सेवेसाठी ग्राहकांना कोणतेही शुल्क लावू नये हे कलम अवश्य घातले जावे.

२) रु २५०/- पेक्षा अधिक मूल्य नसलेल्या भेट वस्तु आणि

३) भारतीय रिझर्व बँकेने वेळोवेळी मंजुर केल्यानुसार कर्मचाऱ्यांना देण्यात आलेली प्रोत्साहन बक्षिसे (इन्सेंटिव्हज्)

ई) वरील खंड (ड) च्या उपखंड (१) मध्ये परवानगी असलेल्या बाबी व्यतिरिक्त अन्य कोणत्याही रीतीने किंवा स्वरुपात, मोबदला, किंवा शुल्क किंवा दलालीचे प्रदान करुन, ठेवी गोळा करण्यासाठी किंवा ठेवीसंबंधीचे अन्य उत्पाद विकण्यासाठी कोणत्याही व्यक्तीची, संस्थेची, कंपनीची, संघाची, किंवा अन्य व्यक्तीची नेमणुक करणे.

फ) बक्षिस/लॉटरी/निःशुल्क सफरी (भारतात किंवा / आणि विदेशात) इत्यादी प्रलोभनांवर डिपॉझिट मोबिलायझेशन योजना सुरु करणे. येथे स्पष्ट करण्यात येत आहे की, बँकांनी बक्षिसे/लॉटरी/निःशुल्क सफरी (भारतात किंवा / आणि विदेशात) इत्यादी प्रलोभनांवर अधारित कोणतेही बँकिंग उत्पाद व ऑनलाईन रिमिटन्स स्कीम्स देऊ करु नये. (ह्याला अपवाद म्हणजे रु २५०/- पेक्षा अधिक नसलेल्या भेटवस्तु देणे) कारण अशा उत्पादांमध्ये मूल्य यंत्रणेत पारदर्शकता नसते व त्यामुळे तसे करणे हे ह्या मार्गदर्शक तत्वांच्या विरुध्द ठरते. बँकांनी असे उत्पाद देऊ केल्यास ते ह्या मार्गदर्शक तत्वांचे उल्लंघन समजले जाईल व त्या बँका कायदेशीर कारवाईस पात्र ठरतील.

ग) अस्तित्वात असलेल्या / भावी कर्जदारांच्या कर्जविषयक गरजा पूर्ण करण्यासाठी एजंट / तिसऱ्या पक्षांकडून स्त्रोत निर्माण करण्यासाठी बेकायदेशीर कामे करणे किंवा डिपॉझिट मोबिलायझेशन मोबदला म्हणून मध्यस्थांना कर्ज देऊ करणे.

ह) एखाद्या विशिष्ट कालावधीसाठी बँकेने प्रत्यक्ष देऊ केलेल्या सरळ व्याजदराचा उल्लेख न करता केवळ संयुक्त (कंपाउंडेड) उत्पन्न ठळकपणे दाखवून जनतेकडून ठेवी मिळविण्यासाठी जाहिराती / साहित्य प्रसिध्द करणे. ठेवीच्या मुदतीसाठी सरळ व्याजाचा दर अवश्य निर्देशित केला जावा.

आय) चालु खात्यात ठेवलेल्या मार्जित रकमेवर व्याज देणे.

जे) चालु खात्यात ठेवलेल्या रकमेविरुध्द, बँकेने टेंडरर्सना (कंत्राटदार) दिलेल्या व सरकारी विभाग/अर्ध सरकारी संस्था/स्थानिक संस्था ह्यांना सादर करावयाच्या "डिपॉझिट ॲट कॉल" पावत्यांवर व्याज देणे.

के) चालु खात्याव्यतिरिक्त व्याजमुक्त ठेवी स्वीकारणे व अप्रत्यक्षपणे मोबदला / भरपाई देणे.

ल) खाजगी वित्तपुरवठेदरांच्या लाभार्थी ग्राहकांच्या नावे ठेव-पावत्या देण्याची तरतुद असलेले करारनामे करुन, खाजगी वित्तपुरवठेदार किंवा कॉर्पोरेट नसलेल्या संस्थाकडून ठेवी घेणे किंवा अशा ठेवी परिपक्व झाल्यावर अशा ग्राहकांना, मुखत्यारनामा, नामनिर्देशक किंवा अन्य तऱ्हेने त्या मिळवण्यासाठी अधिकारपत्र देणे.

(म) अन्य बँकांमध्ये ठेवलेल्या मुदत ठेवी किंवा स्थिर ठेवींविरुद्ध अग्रिम राशी देणे.

(न) (१) सरकारी विभाग / संस्था ह्यांना त्यांची कार्ये करण्यासाठी, अंदाजपत्रकात दिलेल्या आर्थिक वाटपानुसार / नगरपालिका किंवा नगरसमिती / पंचायत समिती / राज्य गृहनिर्माण मंडळे / जल व जलनिःसारण मंडळे राज्य पाठ्यपुस्तक प्रकाशन मंडळे / सोसायट्या / महानगर विकास अधिकरण / राज्य/ जिल्हा स्तरीय गृह सहकारी सोसयट्या इत्यादी किंवा कोणताही राजकीय पक्ष किंवा कोणतीही ट्रेडिंग / धंदेवाइक संस्था ह्यांच्या नावे बचत ठेव खाते उघडणे मग अशी संस्था मालकीची, भागीदारीची किंवा कंपनी किंवा एक संघ असो किंवा नसो.

**स्पष्टीकरण**

ह्या कामाबाबत "राजकीय पक्ष" म्हणजे सध्या लागु असलेल्या इलेक्शन सिंबॉल्स ऑर्डर (रिझर्वेशन अँड ॲलॉट मेंट) १९६८ खाली पंजीकृत झालेला किंवा पंजीकृत होऊ घातलेला भारतीय नागरिकांचा संघ किंवा संस्था.

(२) **जोडपत्र ३** मध्ये सूचिबद्ध केलेल्या संस्था / एजन्सीसाठी वरील मनाई लागु नाही.

**जोडपत्र -१**

**देशांतर्गत/सर्वसाधारण अनिवासी (एन आर ओ) खात्यात ठेवलेल्या ठेवींवरील व्याजदर**
**(परिच्छेद २.२ ब (१))**

| **खात्याचा वर्ग** | **(दरसाल दर शेकडा)** |
|---|---|
| (१) चालु | काही नाही |
| (२) बचत* | ४.० (मे ३, २०११ ते ऑक्टोबर २४, २०११ पर्यंत) निःशुल्क (ऑक्टोबर २५, २०११ पासून) |
| (३) मुदत ठेव* (किमान काल ७ दिवस) | निःशुल्क |

*कार्यवाहीतील सुलभतेसाठी, देशांतर्गत / एनआरओ खात्यांवरील व्याजदार त्याच्या दोन दशांश स्थळापर्यंत राउंड ऑफ केला जावा.

*मे ३ ते डिसेंबर १५, २०११ पर्यंतच्या काळासाठी, एनआरओ बचत ठेवींवरील व्याजदर ४% द.सा. होता. डिसेंबर १६, २०११ पासून, व्याजदरांचे डिरेग्युलेशन करण्यात आले आहे. तथापि, बँकांनी एनआरओ ठेवींवर देऊ केलेले व्याजदर, त्यांनी तुलनात्मक रितीने देशांतर्गत रुपये ठेवींवर देऊ केलेल्या व्याजदरांपेक्षा अधिक असू नयेत.

**जोडपत्र - २**

**अनिवासी (बाह्य) खात्यातील ठेवलेल्या ठेवींवर**
**लागु असलेले व्याजदर**
**(परिच्छेद २.२ (ब) (१) )**

| | | |
|---|---|---|
| १ | चालु | काही नाही |
| २ | बचत खाते | डिसेंबर १६, २०११ पासून व्याजदरांचे डिरेग्युलेशन करण्यात आले आहे. तथापि, बँकांद्वारे एनआरई ठेवींवर देऊ करण्यात आलेले व्याजदर, तुलनात्मकरीत्या, देशांतर्गत रुपये ठेवींवर त्यांच्याद्वारे दिल्या जाणा-या व्याजदरांपेक्षा अधिक नसावेत. |
| | | ऑक्टोबर २५, २०११ पासून देशांतर्गत बचत ठेवींवरील व्याजदरांचे डिरेग्युलेशन करण्यात आले असल्याने, ऑक्टोबर २५ ते डिसेंबर १५, २०११ ह्या कालासाठी, एनआरई बचत ठेवींवरील व्याजदर हा, परिपत्रक डीबीओडी.डीआयआर.बीसी. ८९ व ९०/१३.०३.००/२०१०-११ मध्ये विहित केल्यानुसार दरसाल ४% होता. |
| | | नोव्हेंबर १७, २००५ रोजी भारतातील व्यवहार बंद झाल्यावर ते ऑक्टोबर २४, २०११ पर्यंत, एनआरई बचत ठेंवीवरील व्याजदर, युएस डॉलर ठेवींवर, सहा महिन्यांच्या परिपक्वतेच्या लिबॉर/स्वॅप दरांच्या ऐवजी, देशांतर्गत बचत खात्याला लागु असलेल्या व्याजदाराएवढेच असतील. |
| ३ | मुदत ठेवी | डिसेंबर १६, २०११ रोजी भारतातील व्यवहार समाप्तीपासून अनिवासी (बाह्य) रुपये (एनआरई) ठेवींवरील व्याजदर डिरेग्युलेट करण्यात आले आहेत. त्यानुसार, अनिवासी (बाह्य) रुपये (एनआरई) ठेवी खात्यांखाली, एक वर्ष व त्यापेक्षा अधिक अशा दोन्हीही परिपक्वता कालावधीच्या मुदत ठेवींवरील व्याजदर ठरविण्याचे स्वातंत्र्य बँकांना देण्यात आले आहे. |
| | | नोव्हेंबर २३ ते डिसेंबर १५, २०११ पर्यंत भारतातील व्यवहार समाप्तीपासून, एक ते तीन वर्षांसाठी असलेल्या एनआरई ठेवींवरील व्याजदर, तत्सम परिपक्वता कालाच्या युएस डॉलर्ससाठी, मागील महिन्याच्या शेवटच्या कामाच्या दिवशी असलेल्या, लिबॉर/स्वॅप रेट्स अधिक २७५ बेसिस पॉईंट्सपेक्षा जास्त असू नयेत. (नोव्हेंबर १५, २००८ रोजी व्यवहार बंद झाल्यावर असलेल्या लिबॉर/स्वॅप रेट्स अधिक १७५ बेसिस पॉईंट्सच्या तुलनेने) |
| | | नोव्हेंबर १५, २००८ रोजी भारतात व्यवहार बंद झाल्यावर पासून ते नोव्हेंबर २२, २०११ पर्यंत, एक ते तीन वर्षांसाठी असलेल्या एनआरई ठेंवीवरील व्याजदर हे, परिपक्वताकालच्या युएस डॉलर्ससाठी, मागील महिन्याच्या शेवटच्या कामाच्या दिवशी असलेल्या लिबॉर/स्वॅप रेट्स अधिक १७५ बेसिस पॉईंट्सपेक्षा जास्त असू नयेत (ऑक्टोबर १५, २००८ रोजी व्यवहार बंद झाल्यावर असलेल्या लिबॉर/स्वॅप रेट्स अधिक १०० बेसिस पॉईंटसच्या तुलनेने) |
| | | मागील महिन्याच्या शेवटच्या दिवशी असलेले लिबॉर/स्वॅप रेट्स हे, पुढील महिन्यापासून लागु होणऱ्या व्याज दरांसाठी मर्यादा-दर ठरविण्याचा आधार म्हणून समजले जातील. |
| | | व्याजदरांमधील वरील बदल हे सध्याच्या परिपक्वता कालानंतर नूतनीकरण केलेल्या प्रत्यावर्तनक्षम असलेल्या एनआरई ठेवींनाही लागु होतील. |
| | | २९.०४.२००३ पासून नवीन एनआरई ठेवींसाठी असलेला परिपक्वकाल हा |

| | | |
|---|---|---|
| | | सर्वसाधारणतः एक ते तीन वर्षाचा असेल. सध्याच्या परिपक्वता काळानंतर नूतनीकरण केलेल्या एनआरई ठेवींनाही हे लागु होईल. एखाद्या बॅंकेला तिच्या ॲसेट लायबिलिटी मॅनेजमेंटच्या दृष्टीकोनातून ३ वर्षांपेक्षा अधिक परिपक्वता काल असलेल्या ठेवी स्वीकारवयाच्या असल्यास, ती तसे करु शकते. मात्र तेव्हा, अशा दीर्घ मुदतीच्या ठेवींवरील व्याजदर ३ वर्षांच्या एनआरई ठेवींना लागु असलेल्या व्याजदरापेक्षा अधिक नसावा. |
| | | कार्यवाहीच्या सोयींसाठी, व्याजदर, सर्वात जवळच्या दोन दशांश स्थळांपर्यत राउंड ऑफ केले जावेत. उदा. ३.६७६% चा चक्रवाढ व्याजदार हा ३.६८% होईल आणि ३.६४४% चे ३.६४% हीतील. |
| | | रॉयटर्स स्क्रीनच्या सर्व ग्राहक, फेडाईने दिलेले प्रत्येक महिन्याच्या शेवटच्या कामाच्या दिवशी असलेले लिबॉर/स्वॅप रेट्स वेबपेजवरुन ॲक्सेस करु शकतात. पुढील महिन्यापासून लागू होणाऱ्या व्याजदारांसाठी हेच दर आधारभूत समजले जावेत. |

जोडपत्र - ३

<u>ह्या निदेशातील कलम २.२७ (एन)(१) मधील लागु नसलेल्या</u>
<u>संस्था / कपन्यांची यादी</u>

१) ह्या बँकेकडुन वित्तसहाय्य होत असलेली प्राथमिक सहकारी कर्ज सोसायटी

२) खादी व ग्राम उद्योग मंडळे

३) कृषि उत्पाद विपणन समित्या

४) सोसायटीज् रजिस्टेशन आधिनियमन,१९८० खाली किंवा एखाद्या राज्यात किंवा केंद्रशासित प्रदेशात जारी असलेल्या तशा कायद्याखाली पंजीकृत झालेल्या सोसायट्या (राज्य सहकारी सोसायट्या अधिनियम व भू-तारण बँका निर्माण करणारे विशिष्ट राज्य अधिनियम सोडून).

५) कंपनीज ॲक्ट १९५६ द्वारा नियंत्रित आणि ह्या आधिनियमाच्या कलम २५ खाली केंद्र सरकारने परवाना दिलेल्या कंपन्या किंवा इंडियन कंपनीज अधिनियमन १९१३
मधील तशा तरतुदीनुसार, त्यांच्या नावापुढे “लिमिटेड” किंवा “प्रायव्हेट लिमिटेड” हे शब्द न जोडण्याची परवानगी मिळालेल्या कंपन्या.

६) वरील खंड २.२७ (न) (१) व्यतिरिक्त व आयकर आधिनियमन,१९६१ खाली ज्यांच्या सर्व उत्पन्नात आयकर भरण्याबाबत सूट मिळाली आहे अशा अन्य संस्था

७) केंद्रसरकार /राज्यसरकारे ह्यांनी आयोजित केलेल्या निरनिराळ्या कार्यक्रमांच्या / योजनांच्या अंमलबजावणीसाठी दिलेल्या अनुदान / अर्थसहाय्य ह्यांच्याशी संबधित असलेले सरकारी विभाग / बॉडीज् / एजन्सीज् मात्र ह्यासाठी केंद्र सरकार / संबधित राज्य सरकारांच्या विभांगाकडून बचत खाते उघडले जाण्याबाबत आधिकरण सादर केले असले पाहिजे.

८)ग्रामीण भागातील स्त्रिया व बालके ह्यांची विकास संस्था (डीडब्ल्युसीआर ए)

९)पंजीकृत असलेले किंवा नसलेले व त्यांच्या सभासदांमध्ये बचतीच्या सवयीचा प्रचार करणारे स्वंयंसेवी गट (एसएचजी)

१०)शेतकऱ्याचे क्लब्ज्-विकास व्हॉलेंटियर वाहिनी (व्ही व्ही व्ही)

**परिशिष्ट**

## देशांतर्गत/एनआरओ/एनआरई खात्यांमध्ये ठेवलेल्या रुपये-ठेवींवरील व्याजदरांवरील महापरिपत्रकात एकत्रित केलेल्या परिपत्रकांची यादी

| अनु क्र. | परिपत्रक क्र. | दिनांक | विषय |
|---|---|---|---|
| १ | डीबीओडी क्र.डीआयआर. बीसी.४६ आणि ४७/१३.०३.००/२०००-२००१ | ४.११.२०००* | देशांतर्गत, सर्वसाधारण अनिवासी (एनआरओ), अनिवासी विशेष रुपये (एनएसएसआर) व अनिवासी (बाह्य) (एनआरई) खात्यांमध्ये ठेवलेल्या रुपयांमधील ठेवींवरील व्याजदरांवरील महा-निदेश |
| २ | डीबीओडी.क्र.एफएससी.बीसी.६१/२४.९१.००१/२००० | २९.१२.२००० | कॉल/नोटिस मनी मार्केट आणि बिल्स रिडिसकाऊंटिंग योजनेमध्ये भाग घेण्यासाठी परवानगी -खाजगी क्षेत्रातील म्युच्युअल फंड |
| ३ | एीबीओडी क्र.डीआयआर बीसी.६२ ः ६४/१३.०३.००/२०००-०१ | ०३.०१.२००१ | ठेवींवरील व्याजदर |
| ४ | डीबीओडी क्र.डीआयआर बीसी.६९/२४.१०३.००१/२००० | ०३.०१.२००१ | मृत ठेवीदाराच्या मुदत ठेवीवर व्याज प्रदान |
| ५ | डीबीओडी.क्र.एफएससी.बीसी.८०/२४.१०३.००१/२००० | २०.०२.२००१ | कॉल/नोटिस मनी मार्केट आणि बिल्स रिडिसकाऊंटिंग योजनेमध्ये भाग घेण्यासाठी परवानगी-विमा कंपन्या |
| ६ | डीबीओडी.क्र.एफएससी.बीसी.८५/२४.१०३.००१/२००१ | ०१.०३.२००१ | कॉल/नोटिस मनी मार्केट आणि बिल्स रिडिसकाऊंटिंग योजनेमध्ये भाग घेण्यासाठी परवानगी-विमा कंपन्या |
| ७ | डीबीओडी क्र डीआयआर.बीसी १०४ आणि १०७/१३.०३.००/२०००-०१ | १९.०४.२००१ | २००१-२००२ वर्षासाठी नाणेविषयक व पत धोरण - व्याजदर धोरण |
| ८ | डीबीओडी.क्र.एफएससी.बीसी.१२५/२४.९२.००१/२०००-०१ | २५.०५.२००१ | कॉल/नोटिस मनी मार्केट आणि बिल्स रिडिसकाऊंटिंग योजनेमध्ये भाग घेण्यासाठी परवानगी - प्राथमिक डीलर्स |
| ९ | डीबीओडी.क्र.एफएससी.बीसी.०१/२४.९१.००१/२००१-०२ | ०५.०७.२००१ | कॉल/नोटिस मनी मार्केट आणि बिल्स रिडिसकाऊंटिंग योजनेमध्ये भाग घेण्यासाठी परवानगी -खाजगी क्षेत्रातील म्युच्युअल फंड |
| १० | डीबीओडी क्र.डीआयआर बीसी.३०/२४.९१.००१/२००१- | २८.०९.२००१ | कॉल/नोटिस मनी मार्केट आणि बिल्स रिडिसकाऊंटिंग योजनेमध्ये भाग घेण्यासाठी परवानगी -खाजगी क्षेत्रातील म्युच्युअल फंड |
| ११ | डीबीओडी क्र.डीआयआर बीसी.३१/२४.९२.००१/२००१-०२ | २८.०९.२००१ | कॉल/नोटिस मनी मार्केट आणि बिल्स रिडिसकाऊंटिंग योजनेमध्ये भाग घेण्यासाठी परवानगी - प्राथमिक डीलर्स |

| | | | |
|---|---|---|---|
| १२ | डीबीओडी क्र.डीआयआर बीसी.४१/२४.९१.००१/२००१-०२ | ०१.११.२००१ | कॉल/नोटिस मनी मार्केट आणि बिल्स रिडिसकाऊंटिंग योजनेमध्ये भाग घेण्यासाठी परवानगी -खाजगी क्षेत्रातील म्युच्युअल फंड |
| १३ | डीबीओडी क्र.डीआयआर बीसी.४९/२४.९२.००१/२००१-०२ | २४.११.२००१ | कॉल/नोटिस मनी मार्केट आणि बिल्स रिडिसकाऊंटिंग योजनेमध्ये भाग घेण्यासाठी परवानगी - प्राथमिक डीलर्स |
| १४ | डीबीओडी क्र.डीआयआर बीसी.५१/२४.९२.००१/२००१-०२ | ०४.१२.२००१ | कॉल/नोटिस मनी मार्केट आणि बिल्स रिडिसकाऊंटिंग योजनेमध्ये भाग घेण्यासाठी परवानगी - प्राथमिक डीलर्स |
| १५ | डीबीओडी क्र.डीआयआर बीसी.८५/२४.९२.००१/२००१-०२ | ०३.०४.२००२ | कॉल/नोटिस मनी मार्केट आणि बिल्स रिडिसकाऊंटिंग योजनेमध्ये भाग घेण्यासाठी परवानगी - प्राथमिक डीलर्स |
| १६ | डीबीओडी क्र.डीआयआर बीसी.९३/१३.०१.०९/२००१-०२ | २९.०४.२००२ | ठेवी योजनांची संपूर्ण परिवर्तनीयता - अनिवासी भारतीय एनआरएनआर खाती व एनआरएसआर खाती |
| १७ | डीबीओडी क्र.डीआयआर बीसी.३८/१३.०३.००/२००२-०३ | ०५.११.२००२ | २००२-२००३ वर्षासाठीच्या नाणेविषयक व पत धोरण - बँका/आरआरबी/स्थानिक क्षेत्र बँकांद्वारे ठेवींवरील व्याजदर |
| १८ | डीबीओडी क्र.डीआयआर बीसी.४५/२४.९२.००१/२००२-०३ | ०३.१२.२००२ | कॉल/नोटिस मनी मार्केट आणि बिल्स रिडिसकाऊंटिंग योजनेमध्ये भाग घेण्यासाठी परवानगी - प्राथमिक डीलर्स |
| १९ | डीबीओडी क्र.डीआयआर बीसी.५१/१३.०३.००/२००२-०३ | १४.१२.२००२ | काही विशिष्ट संस्थांच्या नावे बचत खाते उघडणे |
| २० | डीबीओडी क्र.डीआयआर बीसी.५३/१३.१०.००/२००२-०३ | २६.१२.२००२ | बचत खात्यातील किमान शिल्लक |
| २१ | डीबीओडी क्र.डीआयआर बीसी.७५/१३.०३.००/२००२-०३ | २८.०२.२००३ | ठेवींवरील व्याजदर |
| २२ | डीबीओडी क्र.एफ एस सी.बीसी. ८५ व ८६/२४.९१.००१/२००२-०३ | २६.०३.२००३ | कॉल/नोटिस मनी मार्केट आणि बिल्स रिडिसकाऊंटिंग योजनेमध्ये भाग घेण्यासाठी परवानगी - प्राथमिक डीलर्स |
| २३ | डीबीओडी क्र.एफ एस सी.बीसी. ८६/२४.९१.००१/२००२-०३ | २६.०३.२००३ | कॉल/नोटिस मनी मार्केट आणि बिल्स रिडिसकाऊंटिंग योजनेमध्ये भाग घेण्यासाठी परवानगी -खाजगी क्षेत्रातील म्युच्युअल फंड |
| २४ | डीबीओडी क्र.डीआयआर बीसी.१०१ व १०२/१३.०१.०९/२००२-०३ | २९.०४.२००३ | अनिवासी (बाह्य) रुपये खात्याखालील (एनआरई खाती) ठेवी |
| २५ | डीबीओडी क्र.डीआयआर बीसी.१ व २/१३.०१.०९/२००३-०४ | २६.०३.२००३ | अनिवासी (बाह्य) रुपये खात्याखालील (एनआरई खाती) ठेवी वरील व्याज |
| २६ | एमपीडी.बीसी.२३७/०७.०१.२७९/२००३-०४ | १७.०७.२००३ | अनिवासी (बाह्य) रुपये खात्याखालील (एनआरई खाती) ठेवी वरील व्याज |
| २७ | डीबीओडी क्र.डीआयआर बीसी.२५ व २६ /१३.०१.०९/२००३-०४ | १७.०७.२००३ | अनिवासी (बाह्य) रुपये खात्याखालील (एनआरई खाती) ठेवी वरील व्याज |

| | | | |
|---|---|---|---|
| २८ | डीबीओडी क्र.डीआयआर बीसी. ३५ व ३६ /१३.०१.०९/२००३-०४ | १८.१०.२००३ | अनिवासी (बाह्य) रुपये खात्याखालील (एनआरई खाती) ठेवी वरील व्याज |
| २९ | डीबीओडी क्र.डीआयआर बीसी. ६८ व ६९/१३.०३.००/२००३-०४ | १३.०२.२००४ | देशांतर्गत, सर्वसाधारण अनिवासी (एनआरओ) आणि अनिवासी (बाह्य) (एनआरई) खात्यांमधील रुपये ठेवींवरील व्याजदर |
| ३० | डीबीओडी क्र डीआयआर.बीसी ७५ व ७६/१३.०१.०९/२००३-०४ | १७.०४.२००४ | देशांतर्गत, सर्वसाधारण अनिवासी (एनआरओ) आणि अनिवासी (बाह्य) (एनआरई) खात्यांमधील रुपये ठेवींवरील व्याजदर |
| ३१ | डीबीओडी क्र.डीआयआर बीसी.७८/१३.०३.००/२००३-०४ | २२.०४.२००४ | सार्वजनिक सेवेवरील प्रोसिजर्स व परफॉर्मन्स ऑडिटवरील समिती - अहवाल क्र.३ - बँकिंग कार्यकृती : व्यक्तींसंबंधाने (अ-व्यापारी) ठेवी खाती व इतर सुविधा |
| ३२ | डीबीओडी क्र.डीआयआर बीसी.५३ व ५४/१३.०३.००/२००३-०४ | ०१.११.२००४ | अनिवासी (बाह्य) रुपये खात्याखालील (एनआरई खाती) ठेवी वरील व्याज |
| ३३ | डीबीओडी क्र एलईजी .बीसी.४४/०९.०७.०५/ २००५-०६ | ०१.११.२००४ | वित्तीय समावेश |
| ३४ | डीबीओडी क्र.डीआयआर बीसी.४८/१३.०३.००/२००५-०६ | १७.११.२००५ | अनिवासी (बाह्य) रुपये खात्याखालील (एनआरई खाती) ठेवी वरील व्याज |
| ३५ | डीबीओडी क्र.बीएल.बीसी.५८/२२.०१.००१/२००५-०६ | २५.०१.२००६ | बँक सेवांचा विस्तार करुन वित्तीय समावेश  बिझिनेस (फॅसिलिटेटर्स) सहाय्यक व कॉरेस्पाँडंट्सचा वापर |
| ३६ | डीबीओडी क्र डीआयआर. ६२/१३.०३.००/२००५-०६ | ०८.०२.२००६ | अनिवासी ठेवींवरील व्याजदर |
| ३७ | डीबीओडी क्र डीआयआर. ८०/१३.०३.००/२००५-०६ | १८.०४.२००६ | अनिवासी (बाह्य) रुपये खात्याखालील (एनआरई खाती) ठेवी वरील व्याज |
| ३८ | ए.पी.(डीआयआर मालिका) परिपत्रक क्र.२९ | ३१.०१.२००७ | विदेशी मुद्रा व्यवस्थापन (ठेवी) विनियम, २००० - अनिवासी (बाह्य) रुपये खाती (एनआर(ई) आरए/विदेशी मुद्रा अनिवासी (बँका) (एफसीएनआर(बी)) ठेवी ह्यांच्या प्रतिभूती विरुध्द अनिवासी व्यक्ती/तृतीय पक्ष ह्यांना कर्जे देणे |
| ३९ | डीबीओडी क्र.डीआयआर बीसी.५४ व ५५/१३.०३.००/२००६-०७ | ३१.०१.२००७ | अनिवासी (बाह्य) रुपये (एनआरई) ठेवी आणि एफसीएनआर(बी) ठेवींवरील व्याजदर |
| ४० | डीबीओडी क्र.डीआयआर बीसी.७०/१३. ०१.०१/२००६-०७ | ३०.०३.२००७ | जवळच्या रुपयापर्यंत चेक्स राऊंड ऑफ करणे |
| ४१ | डीबीओडी क्र.डीआयआर बीसी.८८ व ८९/१३.०३.००/२००६-०७ | २४.०४.२००७ | अनिवासी (बाह्य) रुपये (एनआरई) ठेवी आणि एफसीएनआर(बी) ठेवींवरील व्याजदर |
| ४२ | डीबीओडी.क्र.एलईजी.बीसी.९४/०९.०७.००५/२००६-०७ | ०७.०५.२००७ | २००७-०८ वर्षासाठीचे वार्षिक धोरण निवेदन - आयटी-मुक्त वित्तीय समावेश |
| ४३ | डीबीओडी.क्र डीआयआर. बीसी. ३९/१३.०३.००/२००७-०८ | २५.१०.२००७ | लॉक-इन-पिरियड असलेल्या ठेव-योजना |
| ४४ | डीबीओडी.क्र.एलईजी.बीसी.३४/०९.०७.०० | २२.०८.२००८ | बँकांमधील हक्क न सांगितलेल्या |

| | | | |
|---|---|---|---|
| | ५/२००८-०९ | | ठेवी/अकार्यकारी खाती |
| ४५ | डीबीओडी.क्र.एलईजी.बीसी.४७/०९.०७.०० ५/२००८-०९ | १९.०९.२००८ | बँकांनी गोठविलेल्या खात्यांवर व्याज प्रदान |
| ४६ | डीबीओडी क्र.डीआयआर बीसी.८२/१३.०३.००/२००८-०९ | १५.११.२००८ | अनिवासी (बाह्य) रुपये (एनआरई) ठेवी आणि एफसीएनआर(बी) ठेवींवरील व्याजदर |
| ४७ | डीबीओडी क्र.डीआयआर बीसी.१२८/१३.०३.००/२००८-०९ | २४.०४.२००९ | बचत बँक खात्यावर दैनिक उत्पाद धर्तीवर व्याज देणे |
| ४८ | ए.पी.(डीआयआर मालिका) परिपत्रक क्र.६६ | २८.०४.२००९ | विदेशी मुद्रा व्यवस्थापन (ठेवी) विनियम, २००० - अनिवासी (बाह्य) रुपये खाती (एनआर(ई) आरए/विदेशी मुद्रा अनिवासी (बँका) (एफसीएनआर(बी)) ठेवी ह्यांच्या प्रतिभूती विरुध्द अनिवासी व्यक्ती/तृतीय पक्ष ह्यांना कर्जे देणे |
| ४९ | डीबीओडी क्र.डीआयआर बीसी. ७७/१३.०३.००/२००९-१० | १९.०२.२०१० | बचत बँक खात्यावर दैनिक उत्पाद धर्तीवर व्याज देणे |
| ५० | डीबीओडी क्र.डीआयआर बीसी. ९१/१३.०३.००/२००९-१० | २०.०४.२०१० | मुदत ठेवींमध्ये पुनर्गुंतवणुक करण्यासाठी, मुदत ठेवी, दैनिक ठेवी किंवा आवर्ती ठेवींचे रुपांतरण |
| ५१ | डीबीओडी क्र.डीआयआर बीसी.८९ व ९०/१३.०३.००/२०१०-११ | ०३.०५.२०११ | ठेवींवरील व्याजदर |
| ५२ | ए.पी.(डीआयआर मालिका) परिपत्रक क्र.७० | ०९.०६.२०११ | विदेशी राष्ट्रीयत्वाच्या व्यक्तींद्वारे ॲसेट्सचे प्रेषण  एनआरओ खाती उघडणे |
| ५३ | ए.पी.(डीआयआर मालिका) परिपत्रक क्र.१२ | १५.०९.२०११ | भारतातील रहिवाशांनी ठेवलेली बचत बँक खाती - संयुक्त धारक - उदारीकरण |
| ५४ | ए.पी.(डीआयआर मालिका) परिपत्रक क्र.१३ | १५.०९.२०११ | भारतीय रहिवासी, जवळचा नातेवाईक ह्यांच्याबरोबर संयुक्तपणे एनआरई/एफसीएनआर(बी) खाती असलेले एनआरआय/पीआयओ |
| ५५ | डीबीओडी क्र.डीआयआर बीसी. ४२/१३.०३.००/२०११-१२ | २५.१०.२०११ | बचत बँक ठेवीवरील व्याजदराचे डिरेग्युलेशन - मार्गदर्शक तत्वे |
| ५६ | डीबीओडी क्र.डीआयआर बीसी. ५९/१३.०३.००/२०११-१२ | २३.११.२०११ | अनिवासी (बाह्य) रुपये (एनआरई) ठेवी आणि एफसीएनआर(बी) ठेवींवरील व्याजदर |
| ५७ | डीबीओडी क्र.डीआयआर बीसी. ६४/१३.०३.००/२०११-१२ | १६.१२.१११ | एनआरई ठेवी व एनआरओ खात्यांवरील व्याजदरांचे डिरेग्युलेशन |
| ५८ | डीबीओडी क्र.डीआयआर बीसी. ७५/१३.०३.००/२०११-१२ | २५.०१.२०१२ | बचत बँक ठेवीवरील व्याजदराचे डिरेग्युलेशन - मार्गदर्शक तत्वे |

* डिसेंबर २७, १९८५ च्या मूळ निदेशांच्या जागी, नोव्हेंबर ४, २००० चे परिपत्रक आले असून त्यात, त्या तारखेपर्यंत दिलेल्या सुधारणा/दिलेल्या सूचना समाविष्ट करण्यात आल्या आहेत.